

# मेळव्याघ्र

## 2018



Newsletter of Melghat Tiger Reserve,
Vol.XXVIII, No.1, April 2018





# मेळव्याघ्र

## 2018

Newsletter of Melghat Tiger Reserve,
Vol.XXVIII, No.1, April 2018

Melghat Tiger Reserve,
Amravati, Maharashtra



# मेळव्याघ्र

**2018**

**संपादक मंडळ –**

**श्री.एम.एस. रेड्डी,** *(मुख्य तथा प्रबंध संपादक)*
*मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक,*
*मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती.*

**श्री. विशाल माळी,** *(सहाय्यक संपादक)*
*विभागीय वनअधिकारी, मे.व्या.प्र., अमरावती.*

**Typesetting & Design-**

Printworld Graphics,
Amravati.
Cell : 9096104104

© **Published and Issued by -**

Chief Conservator of Forests & Field Director,
Melghat Tiger Reserve, Amravati. 444 602

Website : www.magicalmelghat.com E-mail : projecttigermelghat@gmail.com

# अनुक्रमणिका...


| | | |
|---|---|---|
| → संपादकीय | ..... | १. |
| → बदलते पर्यटन/पर्यटनाची नवी दिशा | ..... | ३. |
| → वनांवर आधारित उद्योग आणि परंपरा | ..... | ५. |
| → राधा – मी पाहिलेली मेळघाटची पहिली वाघीण | ..... | ७. |
| → टायगर जिंदा रहेगा क्या ? | ..... | ११. |
| → काटेपूर्णा अभयारण्य | ..... | १३. |
| → ज्ञानगंगा अभयारण्य | ..... | १६. |
| → टायगर माय बेस्ट फ्रेन्ड | ..... | १७. |
| → चिखलदरा विदर्भाचे नंदनवन | ..... | १९. |
| → चिखलदरा एक अद्भुत विश्व | ..... | २०. |
| → मॅजीकल चिखलदरा | ..... | २१. |
| → मे.व्या.प्र. रायपुर वनपरिक्षेत्राची माहिती | ..... | २३. |
| → मेळघाटचा ढाण्या | ..... | २७. |
| → लव युवर वर्क | ..... | ३०. |
| → ९ वन्यजीवांमध्ये मुंगीचे अनन्य साधारण महत्व | ..... | ३१. |
| → डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन–वन विकास योजना | ..... | ३२. |
| → वाईल्डलाईफ क्राईम सेल | ..... | ३३. |
| → मेरा प्यारा मेलघाट | ..... | ३४. |
| → उंच उंच असतोस तू | ..... | ३५. |
| → मेळघाट बदलतोय | ..... | ३६. |
| → गाविलगड | ..... | ३८. |
| → अब बात निकली है तो, दुरतलक जाने दो | ..... | ३९. |
| → हरिसाल | ..... | ४१. |
| → कोलकास | ..... | ४२. |
| → मॅजीकल सेमाडोह | ..... | ४३. |
| → जय नरनाळा | ..... | ४४. |
| → कुला– किशोर व्हॉलीबॉल स्पर्धा | ..... | ४५. |

# छत्रपती श्री शिवाजी महाराजांचे आज्ञापत्र

आरमारास तख्ते, सोट, डोलाच्या काठ्या आदिकरुन थोर लाकूड असावे लागते. ते आपले राज्यात अरण्यामध्ये सागवानादि वृक्ष आहेत. त्यांचे जे अनुकूल पडेल ते हुजुर लेहून हुजरचे परवानगीने तोडून न्यावे.

याविरहीत जे लागेल ते परमुलकीहून खरेदी करुन आणावीत जावे. स्वराज्यातील आंबे, फणस आदिकरुन हेही लाकडे आरमाराचे प्रयोजनाची. परंतू त्यांस हात लाऊ न द्यावा. काय म्हणोन की ही झाडे वर्षा दो वर्षांनी होतात यैसे नाही. रयतेने ही झाडे लाऊन लेकरांसारखी बहुतकाळ जतन करुन वाढवविली, ती झाडे तोडिलियावरी त्याचें दुःखास पारावार काये?

येकास दुःख देऊन जे कार्य करीन म्हणेल ते कार्य करणारासहीत स्वल्पकाळेच बुडोन नाहिसेच होते. किंबहुना धन्याचेच पदरी प्रजापीडणाचा दोष पडतो. या वृक्षांच्या अभावे हानीहि होते. याकरिता हे गोष्ट सर्वथा होऊ न द्यावी. कदाचित येखादे झाड जे बुहत जीर्ण होऊन कामातून गेले असेल तरी त्याचे धन्यास राजी करुन द्रव्य देऊन त्याच्या संतोषे न्यावे.



शिवजयंतीच्या हार्दिक शुभेच्छा

Melghat

# संपादकीय...

आज २१ मार्च म्हणजे जागतिक वन दिन. मेळघाटातील वनसंपदा समृद्ध असून, या क्षेत्रास पौराणिक इतिहास असल्याने या क्षेत्राचे खूप मोठे महत्व आहे. संपूर्ण परिसर डोंगर दऱ्यांनी व्यापला असून, या क्षेत्रात भौतिक गरजांची आजही वानवा आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील धोकाग्रस्त व्याघ्र अधिवास क्षेत्रातील गावांचे पुनर्वसन करण्यास प्रथम प्राधान्य देण्याचा मानस आहे. यामध्ये १७ गावांचे पुनर्वसन प्रस्तावित आहे. वाघांचे सनियंत्रण करण्याकरीता राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधीकरणाच्या निर्देशानुसार मेळघाट क्षेत्रात काम सुरू आहे.

मेळघाटच्या दुर्गम भागात कार्यरत क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना मुलभूत सोयी सुविधा पुरविणे व त्यांची कार्यक्षमता वाढविण्या करिता प्रशिक्षणाद्वारे विशेष लक्ष देण्यात येत आहे.

स्थानिक लोकांना वर्षभर रोजगार उपलब्ध करून देणे अत्यंत अगत्याचे आहे. यामध्ये महिलांना गावात किंवा गावालगत स्वयंरोजगार उपलब्ध करून देणे, युवकांना कार्य विशेष प्रशिक्षण देवून त्यांचे कौशल्य विकास साधुन त्यांना रोजगारांचे संधी उपलब्ध करून देण्यात येईल. शेतकरी बांधवांना शेतपिकातुन जैविक शेती व सुधारीत बियाणांचा वापर करून उत्पन्न वाढविण्यावर भर देण्यात येईल. वन्यजीव आश्रयस्थानाचा विकास साधण्याकरिता प्रत्येक २ कि.मी. अंतरावर कायमस्वरूपी पाणवठे विकसीत करण्याचा प्रयत्न राहील.

निसर्ग पर्यटनाला या क्षेत्रात बराच मोठा वाव असून, अपेक्षेनूसार पर्यटनाला पोषक परिस्थिती आणि त्या अनुषंगाने अत्यावश्यक सुविधा निर्माण करण्याची गरज आहे. पर्यटन क्षेत्रातील रस्ते आणि वन्यप्राण्यांना पिण्याच्या पाण्याची पुरेशी सोय यांचेवर भर देण्याचा मनोदय आहे. जेणेकरून, पर्यटनास आलेल्या निसर्गप्रेमींना वन्यप्राणी दर्शन सुलभतेने होऊ शकेल.



निसर्ग पर्यटनावर भर देऊन पर्यटनातून प्राप्त होणारा महसूल हा केवळ पर्यटनासाठी आवश्यक बाबींवरच खर्च व्हावा, यासाठी नियोजनबद्ध आराखडा तयार करण्याचे धोरण ठरविण्यात येईल.निसर्ग पर्यटन हे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचे आधिन

राहूनच करण्यात येईल.

एकंदरीत वन आणि वन्यजीव संरक्षण आणि संवर्धनासाठी जास्तीत जास्त अशासकीय संस्था, निसर्ग प्रेमी यांचा सहभाग घेऊन, मेळघाट व्याघ्र प्रकल्प लोकाभिमूख करण्याचा सातत्याने प्रयत्न केला जात आहे. त्यासाठी जनसामान्यांकडून सहकार्य अपेक्षित असून, या राष्ट्रीय कार्यात सर्वांनी सहभागी होण्याचे मी आवाहन करीत आहे.

श्रीनिवास रेड्डी

**एम.एस. रेड्डी (भा.व.से.)**
मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक
मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती

2.



# बदलते पर्यटन / पर्यटनाची नवी दिशा...





पर्यटन म्हटले की आपल्याला आठवते ते जंगल, तो निसर्ग, त्यातील वन्यप्राणी आणि उत्सुकता ती वाघ बघण्याची. वाघाचे दर्शन हे मेळघाटात दुर्मीळच. वाघांची संख्या जरी बऱ्यापैकी असली तरी उंच सखल डोंगरामुळे, खोल दऱ्यांमुळे, दाट झाडोऱ्यामुळे वन्यप्राण्यांचे दर्शन कमी प्रमाणात होते. खरं तर वाघोबाचे दर्शन होणे हेच पर्यटन आहे का? असे विचारल्यास बहुतांश लोकांच्या मते होय असेच उत्तर येईल पण मेळघाटातील पर्यटनामध्ये त्या पेक्षा कीती तरी इतर बाबी लपलेल्या आहेत.

मेळघाट हा तिन्ही ऋतू मध्ये विविध रूपात दिसतो आणि अतिशय सुंदर रूप त्याने धारण केलेले असते. वन्यप्राण्यांच्या दर्शना पलीकडे वनाची, वनातून वाहणाऱ्या नद्यांची सुंदरता असते, मात्र पर्यटक घरून निघतांनाच आम्हाला वाघ बघायचा आहे या आशेने पर्यटना करीता घरा बाहेत पडतात आणि बरेचदा त्यांना यश देखील मिळते. पर्यटनाचा मुळ अर्थ म्हणजे घरा बाहेर राहुन घेता येणारा निसर्गाचा आनंद हे म्हणणे काही चुकीचे ठरणारे नाही आणि या हेतूने एक छान असा आनंद देणारे पर्यटन म्हणजेच आजचे बदलते पर्यटन. तर चला या करीता आपण मेळघाट अभयारण्यामध्ये असलेल्या हरिसाल या गावाला भेट देऊ व पर्यटनाचे बदलते रूप नेमके काय आहे ते जाणुन घेवू या.

हरिसाल हे साधारण ५०० लोकवस्ती असलेले गाव आहे, ज्याचे अंतर जिल्ह्याच्या ठिकाणापासून म्हणजे अमरावती पासून साधारण १२० कि.मी. इतके व अमरावती – धारणी या मार्गावर वसलेले हे गांव. हरिसाल या गावाला राज्यातील एकमेव डिजीटल गाव असे महत्व प्राप्त झाले असुन बऱ्याच अशा बाबी आहेत ज्यामुळे हरिसाल आता आकर्षणाचे एक ठिकाण बनले आहे.

हरिसाल या गावामध्ये वन्यजीव विभागाचे एक निसर्ग पर्यटन केंद्र आहे, ज्याला लागुनच मेळघाटची प्रमुख नदी सिपना वाहते. संकुला पासुन साधारणत: ५०० मिटर अंतरावर एक काही वर्षापूर्वीचा कोल्हापुरी बांध आहे. जो सिपना नदीवरच आहे. हा कोल्हापुरी बंधारा गेल्या अनेक वर्षांपासून नादुरूस्तच होता आणि पावसाळा संपला की अवघ्या काही दिवसातच नदीचे पाणी आटून जायचे मात्र या वर्षी घडला तो चमत्कार, त्या बंधाऱ्याला वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. आनंद सुरतने व त्यांच्या चमुने सातत्याने काम करून बंधाऱ्याची दारं बंद केली आणि सिपना नदीचे वाहते पाणी थांबवले. आज संकुला जवळील नदी पात्र पाहीले तर साधारणत: ३०० मिटर रूंद आणि १ किमी लांब असे पाणी थांबलेले आहे ज्यामुळे विविध प्रजातीचे पक्षी त्या ठिकाणी आपल्याला पाहायला मिळतात. पाणी थांबल्यामुळे पक्ष्यांची वरदळ तर वाढलीच पण कमाल झाली ती बोटींमुळे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक श्री. रेड्डी साहेब यांनी त्या ठिकाणी दोन बोटी प्रत्येकी दोन सिट्स असलेल्या तर एक बोट एक सिट असलेली हरिसाल संकुल येथे आणि सिपना नदीचा रंगच बदलला. आता पर्यटक येतात, सफारी करतात, काही दिसो अगर ना दिसो ते बोटींग करतांना ज्याला आपण कायाकींग म्हणु भान विसरून जातात अगदी दमछाक होई पर्यंत सिपना नदी पात्रात कायाकींग चा आनंद घेतात. या ठिकाणी कायाकींग करतांना पुर्ण सुरक्षा पुरविले जाते त्या मध्ये पर्यटकांना कायाकींग च्या वेळी लाईफ जॅकेट चा पुरवठा केला जातो, पाणी पण जास्त खोल नसल्याने पर्यटक सहज एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जातात. स्वत: होडी वल्हवायची असल्यामुळे त्याचा आनंद काही औरच असतो.

कायाकींग संपल्यावर पर्यटकांना संकुलामध्येच स्वादीष्ट जेवणाचा आनंद घेता येतो, त्या ठिकाणी विश्रांतीची पण सोय आहे. साधारणत: काही काळ विश्रांती केल्यावर सायंकाळी ७.०० वाजता वेळ होते ती रात्रीच्या सफारीची, रात्रीची सफारी म्हणजे वनातील भ्रमणतीचा रात्रीचा थरार अनुभवायाची वेळ. ही संधी कोणाला पण सोडू वाटणार नाही असा हा आनंद असतो. त्या करीता वनपरिक्षेत्र अधिकारी, हरिसाल यांनी बफर क्षेत्रामध्ये

साधारण ३० किमी ची वाट निर्माण केली आहे. या वाटेवर वाहनाने फिरतांना वन्यप्राणी दिसले किंवा नाही दिसले पर्यटकाला फरकच पडत नाही कारण त्यांना रात्रीच्या सफारीला निघण्यापूर्वी रात्रीचा जंगल भ्रमणतीचा थरार अनुभवयाचा आहे. इतकेच सांगुन नेण्यात येते मात्र अनेक सफारी मध्ये बिबट, तडस, अस्वल, सांभर, सायल, मसव्या, ऊद इत्यादी प्राण्यांचे दर्शन होते. बघितलेले प्राणी पर्यटाकांच्या स्मरणात कितीकाळ राहतात माहीत नाही मात्र रात्रीचातो हरिसालच्या वनातील थरार हा पर्यटक विसरूच शकत नाही.

पौर्णिमेच्या दिवशी असलेल्या चंद्राच्या लख्ख प्रकाश त्या मध्ये मचाणावर बसुन दिसणारे समोरचे पाणस्थळ आणि वन्यप्राणी पाण्यावर येतील ही आशा आणि त्यातच पाणी पिण्याकरिता आलेले वन्यप्राणी त्यांच्या पासून मचाणीचे अंतर अवघे २० ते ३० मिटर मात्र पुर्ण सरक्षित असा हा मचानावर रात्र घालवल्याचा अनुभव. हा कधी न विसरणारा अनुभव असणार आहे. पौर्णिमेच्या दिवशी, तिन दिवस पौर्णिमापुर्वी आणि तिन दिवस पौर्णिमेनंतर असा प्रत्येक महिन्याला एका आडवड्याचा हा कार्यक्रम ज्याला मचान स्टे असे नाव दिले आहे. मचाण ही बऱ्यापैकी मोठी असून त्यावर दोन पर्यटक व एक गाईड हे आरामात रात्र घालवु शकतात.

हरिसाल गावाच्या सभोवतालच्या वनपरिसरात मोठ्या प्रमाणात वन्यप्राणी असुन सफारीकरिता तब्बल ७० किमी चा मार्ग पर्यटकांकरिता खुला करण्यात आला आहे. पर्यटनास सुरूवात होते ती सकाळी सुर्योदयापुर्वी आणि तेही संकुलामधुन थेट रस्ता निघतो तो माताकोल संरक्षण कुटीकडे. या वाटेवर बरेचदा चितळं, कधीतरी अस्वल पाहील्याचे पर्यटक सांगतात. माताकोल संरक्षण कुटीपासून खारी संरक्षण कुटी चे अंतर साधारण ७–८ किमी आहे, मात्र या प्रवासात पाहायला मिळतो तो दुर्मीळ चौसींगा, सांभर, अस्वल, निलगाय आणि मोठ्या प्रमाणात रानकोंबड्या, मोरांच्या अस्तीत्वामुळे तर ही वाट अक्षरश: रंगीत झाल्या सारखी वाटते. गवे हे संपुर्ण वनक्षेत्रात असून त्यांचे देखील या ठिकाणी दर्शन होते. कधी कधी बिबट, वाघ यांचे दर्शन सुद्धा याच वाटेवर झाल्याचे कळाले. पाऊल खुणांच्या बाबतीत बोलायचे झाले तर हमखास सर्वच प्राण्यांच्या पाऊलखुणा त्या मध्ये तळश्याच्या पायाचे ठसे पण पहावयास मिळतात. याच वाटेवर गुल्लरजोड एक ठिकाण आहे. ज्या ठिकाणी गुल्लर म्हणजे उंबराचे मोठे झाड आहे त्या ठिकाणाहून एक वाट ही साधुबाबा पाणवठ्यावर गेली आहे. या भागातील जंगल हे मीश्र स्वरूपाचे निम्न सदाहरीत वृक्ष प्रजातींनी व्यापलेले आहे. त्या मध्ये साजड, तेंदु इत्यादी वनस्पतींचे मोठे प्रमाण आहे. पक्षांचा किलबिलाट, गरूड पक्षी नित्यनेमाने या भागात आढळतात. खारी संरक्षण कुटी पासून बानाभुरा या पानवठ्याकडे जातांना अस्वल, सांभर, गवे यांचे दर्शन होण्याची संधी फारच जास्त आणि वाघ, बिबट्याच्या पाऊलखुणा तर निश्चितच. अतिशय निसर्गरम्य ठिकाण असलेले हरिसाल चे हे वन विविधतेने असे नटलेले आहे की, एकदा पाहून, दोनदा पाहून कधीच समाधानी होत नाही. इतकेच नव्हे तर रानपिंगळा जो भारतात दुर्मीळ या वर्गात मोडणारा पक्षी जो सातपुडा पर्वत रांगेत काही ठिकाणी आढळतो. तो या हरिसाल व लगतच्या जंगलात सर्वत्र आढळतो हे विशेष. इतक्यावरच हरिसालचे जंगल संपले नसुन खवल्या मांजर सारख्यशा अतिशय दुर्मीळ प्राण्याचे अस्तित्व देखील या वनात आढळले आहे. एवढे सगळे जंगल भ्रमण करून झाल्यावर आता विश्रांतीसाठी एक घरासारखी पण ग्रामीण भागातला अनुभव देणारी जागा जर मिळाली तर मग काय, त्यासाठी सुद्धा हरिसाल गावाने तुमची काळजी घेत राहण्यासाठी घरापासून दुर पण घरच अशी सुविधा होमस्टेच्या रूपाने उभारली आहे. आज हरिसाल गावामध्ये पाच स्थानिक कुटूंबांनी व्याघ्र प्रकल्पाच्या मदतीने पर्यटकांकरिता मुक्कामाची व्यवस्था केली आहे. एका कुटूंबाकरिता आवश्यक त्या सर्व किमान सोई सुविधांनी सुसज्ज असे हे होम स्टे आहेत. या मध्ये जीवनाचा एक दिवासाचा जो अनुभव मुक्काम केल्याने मिळतो, त्या एका दिवसात जे स्नेह, माणुसकीची वागणुक त्या कुटूंबाकडून मिळते हे कितीतरी मोठा अनुभव देणारे हे होम स्टे आहे. या मातीच्या व कुळाच्या घरात, कौलारू व टिन पत्र्याचे छत असलेल्या घरात राहण्याचा जो आनंद आहे तो अमुल्य आहे.

आहे ना हरिसाल पर्यटन... एक बदलते पर्यटन ! तर मग चला काय विचार करता एकदा तरी कायाकींग, नाईट सफारी, मचान स्टे, डे सफारी, होम स्टे इत्यादी गोष्टींचा आनंद घेवु या , आणि निसर्गाचा आनंद लुटूया ! तर चला मग.....

**वाय. एस. बहाळे**
सहाय्यक वनसंरक्षक
गुगामल वन्यजिव विभाग, परतवाडा

# 5. वनांवर आधारित उद्योग आणि परंपरा



जेव्हां पृथ्वीची निर्मिती झाली तेंव्हा सर्व प्रथम वृक्षांनी पृथ्वी काबीज केली. वृक्षांनी वेग–वेगळ्या प्रकारचे रूप घेतले. मृदु वेली पासुन ते कठोर वृक्षापर्यंत विकसीत झाले. अशा सर्व प्रकारच्या झाडांच्या, वेलींच्या, लहान मोठ्या वृक्षांच्या वसाहतीस वने संबोधले गेले.

वनांचे पृथ्वीवरील राज्य खुप वर्षांपासून अबाधीत होते. इतर सर्व जीवांची जीविका वनांवर प्रत्यक्षपणे व अप्रत्यक्षपणे अवलंबुन होते. उदा. तृणभक्षी प्राणी प्रत्यक्षपणे वनस्पतींपासून अन्न मिळवितात, तर मांसभक्षी प्राणी तृणभक्षी प्राण्यांवर आपली उपजीविका करतात.

मनुष्य सुद्धा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या जीविके करिता वनस्पतींवर अवलंबुन आहे. मनुष्याने काही वनस्पतींची निवड करून त्यांची लागवड शेती रूपाने केली.

जर जीवनाची उत्क्रांतीच्या सिध्दांतानुसार मनुष्याची उत्पत्ती माकडापासुन (एप) झाली. म्हणजे मनुष्य त्याच्या उत्क्रांतीपासून सुमारे ३ लाख वर्षांपासून जंगलाच्या सहवासात आहे. आज जरी मनुष्य प्रजाती ही प्रगत झाली असली तरी आनंददायी सहली करता तो आपल्या जुन्या घराला म्हणजेच जंगलाला भेट द्यायला विसरत नाही.

आदिम काळापासुन जंगलात राहणाऱ्या मनुष्याचे अनेक व्यवसाय, रूढी व परंपरा जंगलाशी, वनस्पतींशी, वन्य प्राण्यांशी निगडीत आहे.

जगाच्या कानाकोपऱ्यात, डोंगरदऱ्यात राहणाऱ्या आदिवासी जमाती आजही उपजीविकेकरिता वनांवर अवलंबुन आहे. जंगलातुन त्यांना कंदमुळे, फळे, मशरूम इत्यादी खाद्यवस्तु मिळतात.

सदर खाद्यपदार्थ वनांत उगविले असल्याने त्यावर कोणतेही रासायनिक खते वा किटकनाशके फवारलेले नसतात. त्यामुळे ह्या खाद्य पदार्थांना (Organic) या शिर्षकाखाली खुप मागणी व किंमत असते.

जंगलात मिळणारे उत्पादके खालील प्रकारे वर्गीकृत करता येतील.

**वन- उत्पादने व सेवा**

- इमारती लाकुड
- गौण वन उपज
- पर्यटन व जंगल अध्यात्म व आयर्वेदा.

भारताच्या ब्रिटीशकालीन इतिहासात भारतातून मोठ्या प्रमाणात जंगलाचे शोषण करण्यात आले. इंग्रजाचे नौदल, रेल्वे बांधणी करिता मोठ्या प्रमाणात लाकडांचा पुरवठा भारतातुन होत होता. त्याकरिता जंगलाचे शास्त्रीय व्यवस्थापन इंग्रजांनी १८ व्या शतकात सुरू केले. आजही वनविभागात फॉरेस्ट मॅनेजमेंटच्या त्या ब्रिटीशकालीन प्रॅक्टीसेसे दिसुन येतात.

परंतु लाकडाशिवाय अनेक वनोपजांचा खजिना जंगलात मिळतो. तेंदू पाने, मोहा फुले, बांबु शुट, मशरूम, औषधी वनस्पती इत्यादी गौण वनऊपज जंगलात मिळतात.

२१ व्या शतकात जंगलाची व्याप्ती कमी झाली. जंगलाच्या जागी सिमेंट कॉंक्रीटची जंगले उभी राहीली. त्यामुळे जंगलाच्या वापरात बदल करण्याची गरज ओळखुन जंगल पर्यटन व जंगल अध्यात्म या दोन नवीन उद्योगांनी जन्म घेतला. या पुर्वीची वनोत्पदने ही शोषक स्वरूपाची होती, ही उत्पादने ही जंगलाला नष्ट करणारी असल्याने पर्यटनाचा विकल्प पुढे आला. जंगलात चालणे, ट्रेक करणे, तंबु लाऊन निसर्गाच्या सानिध्यात राहणे, वाहन जंगल सफारी करणे इत्यादी उपक्रम राबविले जाऊ लागले.

महाराष्ट्रात ताडोबा, पेंच, उमरेड या ठिकाणी व्याघ्र दर्शन सहज होत असले कारणाने जिप्सी सफारी प्रकारचे पर्यटन इथे प्रसिद्ध झाले आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्प उंच–खोल दऱ्याखोऱ्यांनी, घनदाट झाडांनी नटलेला आहे. इथे ४० पेक्षा जास्त वाघ असून सुद्धा व्याघ्र दर्शन तसे दुर्मिळच. परंतु तसे असुन सुध्दा मेळघाटात निसर्ग प्रेमींची रांगच लागते. बऱ्याचदा पर्यटक इथे योगा–ध्यान धारणा करणेकरिता सुद्धा येतात.

वनांतील इमारती लाकुड व इतर गौण वनोपजा जरी कमी झाले तरी शेतात झाडांची लागवड पद्धती विकसीत झाल्या आहेत. ॲग्रोफोरेस्ट्री, फार्म फॉरेस्ट्री मध्ये युकॅलीप्टस, सागवान, सुबाभुळ

अशी झाडे लावण्यात येतात. प्लायवुड व पेपर उद्योगात नगदी पिकांप्रमाणे या झाडांच्या उत्पादनाचे पैसे मिळतात.

बांबुला हिरवे सोने असे म्हणून संबोधले जाते. बांबुची शेतात लागवड केली असता चांगले उत्पन्न मिळू शकते. उत्तर पूर्व राज्यांमध्ये बांबु शेती प्रणाली व बांबु उद्योग प्रणाली चांगली विकसीत आहे. महाराष्ट्रात सुद्धा वन विभागाद्वारे बांबु तंत्रज्ञान व शिक्षण विकसीत करण्याकरिता चंद्रपुर येथे बांबु प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येत आहे.

शेतपिकात जंगली जनावरे जसे नीलगाय, चितळ, सांबर, काळविट इत्यादी शेतात घुसुन नुकसान करतात. यात वनविभागाद्वारे भरपाई दिली जाते. परंतु या संकटाचे सोने करता येऊ शकते. व्याघ्र प्रकल्पाच्या आजु–बाजुला असणाऱ्या शेतात वन्यप्राणी मोठ्या प्रमाणात येतात. जर या शेतीचे रूपांतर पर्यटनाकरिता करता येऊ शकले तर शेतकरी व वन्यप्राणी दोघांचाही फायदा होऊ शकतो. (विन–विन) शेतकऱ्यांनी शेतात विशिष्ट जंगली झांडांची, गवताची लागवड करावी ; मचाण, पाणवठे व होम स्टे तयार करावे. तिथे पर्यटक येऊन भेट देतील, अशा प्रकारचा एक शासन निर्णय झालेला आहे. परंतु अशा प्रकारच्या पर्यटनास चांगल्या मार्केटींगची आवश्यकता आहे.

मनुष्य व वनाचे नाते आदि काळापासुन आहे. हिंदु संस्कृतीमध्ये प्रत्येक देवी–देवतांचे वाहन हे वन्यजीव आहे. उदा. विष्णु – नाग, लक्ष्मी– घुबड, दुर्गा माता – वाघ, गणपती – उंदीर, तसेच जंगलातून उगम पावणाऱ्या गंगा, गोदावरी सारख्या नद्या सुध्दा पवित्र मानल्या जातात. काही ठिकाणी संपुर्ण वनेच पुजील्या जातात यांना देवराया, देववने म्हणुन संबोधले जाते. पिंपळ, तुळस, वड, औदुंबर या झाडांची पुजा केल्या जाते. रामफळ, सिताफळ या झाडांना देवाची नावे देण्यात आली आहे.

या शिवाय भारतीय संस्कृतीमध्ये वनऔषधीचा वापर मोठ्या प्रमाणात आयुर्वेदात केल्या जातो. अतिशय पुरातन काळी विकसीत झालेले हे वैद्यकशास्त्र आज संपुर्ण जगात प्रसिद्ध झाले आहे.

महाभारतात सुद्धा जंगलाचे व प्राण्यांचे अवलंबन माहीत होते व श्रीकृष्ण पांडव कौरवांना युद्ध न करण्याविषयी समजवतांना म्हणतात की,

*मा वन छिन्दी सव्याघ्रं मा व्याघ्राः विनाशन वनात ।*
*वनं ही रक्षते व्याघ्रो व्याघ्रनं रक्षति काननम ।।*

अर्थात : वाघ असलेल्या वनांना नष्ट करू नका व जंगलातल्या वाघांना मारू नका. कारण जंगलाचे रक्षण वाघ करतो व वाघाचे रक्षण जंगल करतो.

**विशाल माळी**
विभागीय वनअधिकारी
मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती.



# राधा

## मी पाहिलेली मेळघाटची पहिली वाघीण



एप्रिल २०१२, मेळघाटातील माझे पहिलेच वर्ष, जसे कळायला लागले तशी मला मेळघाटाची ओढ लागली होत, ती का? ते आज ६ वर्षांनी पण मला उगमलेलं नाही आहे. असो, त्यावेळेस आमची संस्था वाइल्ड लाईफ रिसर्च ॲन्ड कन्झर्वेशन सोसायटी मेळघाट व्याघ्र प्रकल्पात वाघांच्या गनने साठी कॅमेरा ट्रॅप पद्धतीने वाघांची गनना करत होतो. त्याची पूर्ण जबाबदारी माझ्यावर देण्यात आली होती. हा माझा पहिलाच अनुभव तसा उत्तराखंड मधल्या राजाजी राष्ट्रीय उद्यानात काही वेळ हे काम केल्याचा अनुभव होता पण मेळघाट म्हणजे हे वेगळेच विश्व. इथली प्रत्येक गोष्ट निराळी, सातपुडा पर्वत रांगेतील दऱ्या–खोऱ्यांच आणि निर्भिड अस अरण्याच आणि तशीच निर्भीड माणसं असलेले स्वप्नावत विश्व, ते ह्याच देही अन ह्याच डोळा बघायला भेटण हे माझ्या साठी भाग्यच होत. अन अशा दर्या खोऱ्यात अन कड्या कपारीत वाघाला शोधन म्हणजे एक भगीरथ प्रयत्नच होता. पण हे आव्हान मी पेलण्याच ठरवलं होत, सुरवातीला ह्या वातावरणात रूळायला मला बऱ्याच अडचणी आल्या पण नंतर मी इथे असा काही रूळलो तो कायमचाच.

आमच्या कामाला सुरूवात होऊन जेमतेम एक महिना होत आला होता, मेळघाटात जाणारा प्रत्येक दिवस माझ्यासाठी एक जंगलातील नवीन विश्व दाखवत होता अन मी हे सर्व अनुभवत होतो.

तो मे चा महिना होता, मेळघाटातील मे महिन्यातील उन म्हणजे निखाऱ्यासारखे, विदर्भातील उन्हाळा तेच समजू शकतात ज्यांनी इथला उन्हाळा कधी अनुभवला असेल. त्यासाठी माझ्याकडे एकच शब्द आहे ङ्ग भयंकर , मेळघाट हे सागासाठी जगप्रसिद्ध, उन्हाळ्यात सर्व झाडांची पानगळ होऊन नुसती खोडं उभी असतात. जंगलात सावलीसाठी अशी तुरळक झाड, सूर्याची किरण सरळ जमीन पर्यंत पोहचल्याने जमीन भयंकर तापते, सकाळी ८ वाजताच उन्हाचे चटके लागायला सुरूवात होते, त्यामुळे आम्ही सकाळी लवकर उठून जंगलात जायचो अन उन्ह तापण्याच्या आत रायपूरला परत याचो आमचे त्यावेळेस रायपुर बेस स्टेशन होते. सेमाडोह पासून २० कि.मी. आत जंगलात वसलेले छोटेसे खेडे.

सकाळी लवकर उठने अन चहा पिऊन नंतर हाता दुर्बीण व कॅमेरा घेऊन जंगलात जाणे असा आमचा दिनक्रम.



### कॅमेरा लावल्यानंतरचा एक क्षण...

तो दिवस पण माझ्यासाठी नेहमी सारखाच होता, त्या दिवशीपण आम्ही असेच कॅमेरे चेक करण्यासाठी निघालो होतो. आज मी वैभवच्या टीम बरोबर जाणार होतो कारण त्याला दुसऱ्या जागेवर नोकर लागल्याने त्याने आमची संस्था सोडली होती, अन आता माझ्यावर प्रोजेक्ट ची पूर्ण जबाबदारी आली होती, त्यामुळे

त्याने लावलेले कॅमेरेपण मलाच बघावे लागणार होते. एरिया बराच मोठा होता, आज कज्जू, मंगेय हे स्थानिक मुल नितीन आमच्या गाडीच्या ड्रायव्हरला घेऊन मी निघालो होतो. पहिले सेमाडोह टुरिझम झोन चे कॅमेरे चेक करून आम्ही, तलई चे कॅमेरे चेक करणार होतो, त्या प्रमाणे आम्ही कामाला सुरूवात केली, सकाळी लवकर आम्ही टुरिझम झोन मध्ये पोहचलो अन तिथून कॅमेरे चेक करून कुवापाटी, गेटवर पोहचलो. त्यावेळेस सकाळचे ११ वाजले असतील, तिथे थोडा वेळ थांबून आम्ही तलईकडे निघालो.

गेट पासून काही अंतरावर रायपुर रोडच्या उजव्या हाताला एक रस्ता सरळ तलईहून बिछुखेडा या गावाकडे जातो. मध्ये १५–२० कि.मी. एक ही गाव नाही कि मानवी वर्दळा वा हस्तक्षेप नाही. दोन्ही बाजूंनी टेकड्यांनी वेढलेला दरीचा भाग, त्याच्यातून एक नदी वाहते, मे महिन्यात नदीचे पात्र सुकले पण ठिकठिकाणी नदीच्या पात्रातील डबक्यात अन्य नाल्यामध्ये थोडेथोडे पाणी असते. तेवढ्या पाण्यावरच वन्य प्राण्यांना अवलंबुन राहावे लागते. नदीच्या काठावर ठिकठिकाणी कऊ,अर्जुन, सालई अन बांबू ने दाटी केली होती. ह्याच रोडवरती वन विभागाचा एक वन संरक्षक कॅम्प होता. त्याचेच नाव ङ्ग तलई/कारागोलाईङ्ग, अत्यंत सुंदर अन रमणीय अस ठिकाण. जातांना आम्ही सर्व कॅमेरे चेक केले त्याच्यात आम्हाला सांबर, भेकड, अस्वल, रानगवा यांचे फोटो भेटले पण ज्याच्या साठी आम्ही हा सर्व उपद्रव करत होतो ते जनावर काही भेटत नव्हते, हे सर्व कॅमेरे चेक करण्यासाठी आम्हाला नदी बऱ्याच वेळेस ओलांडावी लागत होती.

कि.मी. ची पायपीट, आम्ही गाडी जिथे उभी केली होती तिथून ५०० मीटर वर नदीच्या दुसऱ्या टोकाला आम्ही येऊन पोहोचलो होतो. तिथे अर्जुनाचे मोठे झाड पुराच्या पाण्याने पडले होते, आम्ही तिथे थोडावेळ आराम करण्याचे ठरविले. आम्ही जिथे बसलो होतो तिथून समोर डाव्या हाताला नदीचे वळण होते, तिथे एक कऊचे झाड होते, त्या झाडावर बरीच लाल तोंडाची माकडे दंगा मस्ती करत होती. आम्ही बऱ्याच वेळपासून त्यांची मजा बघत होतो, त्यांच्यात सर्व वयाची माकडे दिसत होती. ते बघत असतांना मला जगदीश माडगुळकरांनी लिहिलेल्या ङ्ग सत्तांतराची ङ्ग आठवण झाली. मी त्या विचारात असतांनाच आकाशातून सर्प गरूडाने झेप झातली अन् आमच्या डोळ्यासमोर एका माकडाच्या पिलाला त्याने आपल्या पायाच्या धारधार नथात उचलून नेले. त्या माकडांच्या कळपात एकच दंगा सुरू झाला, आरडाओरड, पळापळ आम्हालाही काही कळत नव्हते कि काय झाले, त्या पिल्लाची आई आपल्या पिलासाठी नुसती कावरीबावरी झाली होती. ती ह्या फांदीवरून त्या फांदीवर दात खात उड्या मारत होती. माझ्या डोळ्यांसमोर निसर्गाचे एक निर्दय पण जीवन जगण्यासाठी चा संघर्ष दिसत होता. एका आईने आपल्या पिंलांसाठी दुसऱ्या आईचे आई बाळ उचलून नेले होते, हे जरी निसर्गाचे चक्र असे मानले तरी मी त्या आईच्या वेदनांना डोळेआड करू शकत नव्हतो, अन् म्हणून आम्ही तिथून निघण्याचे ठरविले, अन् त्याच क्षणी अचानक त्या कळपात एक वेगळीच हालचाल जाणवु लागली. सर्व माकड झाडाच्या शेंड्यावर चढू लागली होत अन जोर जोराने अलार्म कॉल देऊ लागली, अस जंगलात तेव्हाच होते जेव्हा एकाखा हिंस्र प्राणी



मेळघाटातील एक वन संरक्षण कुटी –

काही ठिकाणी गाडीसाठी रोड होता पण शेवटच्या ठिकाणी पाण्यापुळे रस्ता पूर्णपणे तुटूण चार–पाच फुटाची घळीच तयार झाली होती. त्यामुळे गाडी तिथेच सोडून आम्हाला पुढे पायीच जावे लागत होतते. आम्ही कॅमेरे चेक करून परत येत होतो त्यावेळस दुपारचे १.३० वाजले होते, उन्ह भयंकर तापले होते, त्याच्यात २–३

जवळपास असेल. पण वाटले त्या सर्प गरूडाच्या भितीने हे असली हालचाल करत असतील. मला पण तिथे थांबणे अवघड झाले होते म्हणून आम्ही तिथून निघालो. मे महिन्याच्या उन्हाने नदीतील दगड तापून विस्तवासारखे झाले होते, नदी ओलांडून आम्ही रस्त्याला लागलो तो रस्ता नदीला समांतर होता. नदी आणि आमच्यात

जवळपास १५ फुटाचे अंतर होते, त्याच्यात रायमुनिया वाढली होती ज्यात आत काही तुरळक सागाची झाड होती. सर्वात पुढे नितीन चालत होता, त्याच्या मागे कज्जू अन मी, अन माझ्या मागे मंगेश, गाडी ३०० मीटर होती अन अचानक मंगेशने मला आवाज दिला .... साब बिबट बैठा है !, मी लगेच कॅमेरा सज्ज करून त्याला विचारले... कहाँ है?..... कारण मेळघाटातील बिबट म्हणजे एक उमद जनावर, ते दिवसा बघायला भेटन म्हणजे नशिबच, मंगेश दुसऱ्या किनाऱ्याकडे बोट दाखवत म्हणाला,

**वो देखो ना साब, गुफे मे बैठा है....**

शंका नाही.

आम्ही ज्या वाघाला बघितले होते ती एक मादी होती, उन्हामुळे त्रस्त होऊन तिने नदीच्या काठावर नैसर्गिकरित्या तयार झालेल्या ह्या गुहेचा आसरा घेतला होता. आम्ही नदीच्या पलीकडून तिला बघत होतो. आमच्या दोघांमध्ये जेमतेम ६०-७० फुटाचे अंतर होते. नदी कोरडी होती, आम्ही जिथे उभे होतो तिथून तिचे फक्त तोंडच दिसत होते, त्यामळे मी रायमुनिच्या पलीकडे जाऊन फोटो घेण्याचे ठरवले, हे थोडे घाटक होते, कारण ती दोनच टप्प्यात माझ्या पर्यंत पोहचली असती. पण फोटो साठी मी हे धाडस दाखवले अन रायमुनिच्या पलीकडे जाण्याचे ठरवले, मी पलीकडे



मी पाहिलेली हीच ती राधा...

## राधेचं पहिलं मुखदर्शन ...

मी जिथे उभा होतो तिथुन मला रायमुनिया मुळे स्पष्ट दिसत नव्हते, मला फक्त गुफेच्या तोंडावर एका जनावराचे तोंड दिसले अन माझ्या तोंडातून निघाले

*" अबे दिवाने, ये बिबट नही टाइगर है टाइगर ....!"*

काही क्षण तर मला कळतच नव्हते कि, मी स्वप्न तर बघत नाहीय ना, मला माझ्या डोळ्यावर विश्वासच बसत नव्हता, कारण माझ्या समोर मेळघाटातला वाघ होता.

मेळघाटचा वाघ.... लोकांचे पुर्ण आयुष्य गेले मेळघाटात पण त्यांनी कधी वाघ बघीतला नव्हता अन मला दोनच महिन्यात वाघाचे दर्शन झाले होते. मी आज खऱ्याअर्थाने धन्य झालो होतो. असे नव्हे कि मेळघाटात वाघ नाही पण, असल्या दऱ्या खोऱ्याच्या प्रदेशात त्यांचे दर्शन होणे म्हणजे भाग्यच. मेळघाटातला वाघ हा खऱ्याअर्थाने पूर्णपणे जंगली आहे, लोकांच्या क्वचित नजरते येणारा, आणि म्हणूनच एवढ्या मानवीय हस्तक्षेपा नंतर पण त्याने आपलेू अस्तित्व टिकवून ठेवले हे ह्याच कारणाने, अन् मला नेहमी वाटते, निसर्ग अस करू नये पण जर जगातील सर्व वाघ नष्ट झाले तर शेवटचा वाघ हा मेळघाटचाच असेल याच्यात तिळ मात्र

जाऊन कॅमेरा झूम केला ती थोडी पण हालचाल करत नव्हती, पूर्णपणे स्तब्ध होऊन ती माझ्याकडे बघत होती, काही क्षण तर मला वाटले कि हा जीवंत वाघ आहे कि पुतळा, काही क्षण तर मला असे वाटले की, ती आम्हाला संमोहित करत आहे, मी मेळघाटात बऱ्याच गोष्टी ऐकल्या होत्या, कि वाघ अन सांबराची जर एक नजर झाली तर सांबर जागच्या जागी थिजत अन वाघ त्याला संमोहित करून त्याची शिकार करतो.

काहीही असो पण मी त्या उमद्या जनावरावर संमोहित झालो होतो, याच्यात काही शंका नव्हती , वाघाला जंगलात पायी बघणे म्हणजे काय हे तेच लोक समजू शकतात ज्यांनी कधी जंगलाचा अनुभव घेतला असेल.

माझी नेहमी एकच इच्छा होती की, मी वाघ बघावा तो पण पायी असतानाच गाडीत बसून नव्हे, आणि ती इच्छा माझी ह्या वाघिणीने पूर्ण केली होती. तिचे बरेच फोटो अन २० सेकंदाचा व्हिडिओ फिल्प बनवल्यावर मी तिला जास्त त्रास नको म्हणून परत जायचे ठरवले. अन् जसा मी मागे पाय टाकला त्याच क्षणी तिने उठून एक डरकाळी फोडली अन गुहेच्या डाव्या बाजूने एका उडित तिने १०-१२ फुट उंच खडक चढून जंगलाची वाट धरली. तिच्या

डरकाळी सरशी त्या दरीतील पूर्ण जंगल जिवंत झाले होते, त्या लाल तोंडाच्या माकडांनी तर शेंडे गाठले होते. अन् जोर जोरोने आलार्म कॉल देत होते. पक्षांचा पण आवाज बदलता होता. मी त्या वाघीनीच्या पाठमोर्या शरीराकडे बघत तसाच तिथे उभा होतो. काही



क्षणातच ती रायमुनियात नजरेआड झाली, पण जंगल पूर्ण जिवंत झाले होते. काळी वेळाने समोराच्या टेकडीवरून भेडकीचे अलार्म कॉल येत होता. तिने टेकडीची वाट धरली होती, मी मागे वळून बघितले तर फक्त मंगेश माझ्या मागे उभा होता. कज्जु अन नितीन तिच्या डरकाळी सरशी कधीच धावत गाडीत जाऊन बसले होते. मी अन मंगेश पण गाडीत येऊन बसलो अन् सेमाडोहचा रस्ता धरला गाडीत सर्वांच्या तोंडात एकच विषय , त्या वाघिणीचा अन गुफेचा ह्याच्या शिवाय कुणालाच काही सुचतच नव्हते.

आम्ही गेटवर पोहचल्यावर वाघाबद्दल सांगितले अन् तिथल्या चौकीदाराला फोटो पण दाखवला, सर्वांनी मला अभिनंदन केले. आम्ही तिथून सरळ सेमाडोह ला पोहचलो. आम्ही तिथे पोहचण्याच्या अगोदरच तिथल्या लोकांना आमच्या व्याघ्र दर्शनाची बातमी कळली होती. त्या गेट वरच्या चौकीदाराने वायरलेस करून सांगितले होते, मी सर्वांना फोटो दाखवला, अन् सर्वात अगोदर सरांना अन म्याडमला फोन करून सांगितले. मग आम्ही मोहितच्या हॉटेल वर चहा पिण्यासाठी गेलो तिथे पण सर्वांनी फोटो बघण्यासाठी मला गराडा घातला, आज मला जणू नोबल जिंकण्याचा अभ्यास होत होता मी त्याच तोऱ्यात सर्वांना फोटो दाखवत होतो. सर्वांच्या तोंडात वाहवा अन् आश्चर्य होते... यात काही शंकाच नव्हती.

मी एक फोटो सेमाडोहचे वनपरिक्षेत्र अधिकार पाचारे साहेबांन पण दाखवला, त्यांनी माझ्या कडून प्रिंटसाठी एक कॉपी घेतली, ती सर्व स्थानिक महत्वाच्या लोकांना भेअ म्हणून दिली, शेवटी ती त्यांचीच मालमत्ता होती, नंतर त्याची एक कॉपी क्षेत्र संचालक कार्यालयात दिली अन् तिथून ती अशी प्रसिद्ध झाली कधी माझ्या नावाने तर कधी दुसऱ्याच्या नावाने, पण हो "पण मेळघाटचा वाघ" म्हणूनच.

## मेळघाटातील विरंगुळा -

या एका फोटोने मला मेळघाटात एक स्वताची ओळख दिली होती म्हणून मी त्या वाघिणीला "राधा" असे नाव दिले होते. ते एका प्रमोचे प्रतिक म्हणून, मी पण तिच्या प्रेमात पडलो होतो, ह्याच्यात काही शंकाच नव्हती. पण ती आता मला पुन्हा कधीच भेटू शकत नव्हती, हे पण तितकेच सत्य होते. त्या राधे प्रमाणेच जिने श्री कृष्णावर जीवापाड प्रेम केले पण ते आयुष्य भर कधीच सोबत राहू नाही शकले. श्रीकृष्णाचे लग्न राधे बरोबर नव्हे तर रूख्मिणी बरोबर झाले. पण, आज जेव्हा पण श्री कृष्णा चे नाव घेतले जात, त्या बरोबर राधेचे पण नाव घेतले जाते. आयुष्यात मिळवणे म्हणजे सर्वकाही नव्हे तर न मिळवता जगावर ठसा सोडून जाणे म्हणजे जीवन. हेच राधेच्या जीवनाची शिकवण. आज जेव्हा पण मेळघाटात हा फोटो प्रसिद्ध होतो त्या बरोबर माझे नाव आपोआप जोडले जाते. मग त्याच्या वर माझे नाव असो वा नसा. म्हणून तिला दिलेलं "राधा" नाव मला एक अर्थाने समर्पकच वाटते.

- तुषार पवार
वन्यजीव संशोधक,
मेळघाट व्याघ्र प्रकल्प
मो. ७०२०८७९५४४
tushar_pawar74@yahoo.com

# TIGER जिंदा रहेगा क्या ?



बघितला का सर्वांनी टायगर जिंदा है, मजा आली असेल नक्कीच. सलमान खान, कैटरीना कैफची जोडी आवडली असेल. देशाच्या संरक्षणाकरिता स्वतःचा जीव धोक्यात टाकणारा सलमान. सिनेमा बघून अंगावर काटा उभा राहिला असेल नाही का ? भारत माता की जय चे नारे लागले असतीलच. यापूर्वी आलेल्या एक था टायगर ने ही धमाल केली होती म्हणे, आता वाट राहीली ती टायगर जिंदा च्या तिसऱ्या भागाची. मस्त वाटत असेल ७० एम.एम. च्या पडद्यावर काल्पनिक सिनेमा बघतांना आणि तो ही पोपकोर्न खातांना. सलमानने केलेली फायटींग, म्हटलेले संवाद त्यासाठी तुम्ही वाजविलेल्या टाळ्या आणि शिट्या, शेवटी कैटरिनाला धोक्यातून वाचविणारा सलमान (टायगर) भाव खावून जातो नाही का ? पण आता विचार करा आणि सांगा टायगर हे नाव माझ. म्हणजे वाघच आणि मी संघर्ष करतोय, जिंदा राहण्यासाठी. टायगर जिंदा है चा तिसरा भाग येईल का ? तर माहित नाही ! पण मी जिंदा भविष्यात राहिला का याची तिळभरही शाश्वती मला नाही. वाघ म्हणजे शौर्याचे प्रतिक, म्हणून आमचे नाव वापरता तुम्ही. कुत्र्याचे किंवा गाढवाचे नाव नाही वापरत. पण हेच पराक्रमाचे प्रतिक शेवटच्या घटका मोजत आहे. माझे भवितव्य धोक्यात असेल जर कुणामुळे तर तुमच्यामुळे, निसर्गाने ही पृथ्वी सर्वांना समान दिली पण तुम्ही तुमच्या सुपिक मेंदूने फक्त अन फक्त या वसुंधरेला विनाशाकडे नेले. खर तर तुमची जबाबदारी होती सर्व सुरळीत आणि संतुलित राखायची, कारण विकसीत मेंदू, समज आणि बोलणे हे फक्त निसर्गाने तुम्हाला बहाल केले पण स्वतःच्या स्वार्थासाठी या निसर्गाला ओरबडायला लागले. आमचे अस्तित्व धोक्यात आणले. पूर्वी घनदाट वने तोडून आमच्या हक्काच्या घरावरती कुऱ्हाड चालवली. सलग जंगले तोडून विकास साधला तुम्ही कि विनाश.

मी तोच वाघ बोलतोय जो कधी शिकारीचा शिकार होऊन होतो. असाह्य वेदना होतात जेव्हा पय त्या जीवघेण्या सापड्यात अडकतो. रक्ताच्या धारा लागतात. जीव कासावीस होतो, रक्ताचा प्रत्येक थेंब बाहेर बडतांनांच्या वेदना, डोळ्यातील अश्रु, येणाऱ्या मृत्यूची वाट बघत. मी त्या सापड्यातून बाहेर पडण्याचा आटोकात प्रयत्न करतो पण असंवेदनशिल मानवाकडून केलेल्या त्या क्रुर कृतीतून मी बाहेर पडू शकत नाही. असाह्य वेदना सहन करत रक्ताचा सळा पसरत जातो आणि मी माझ्या कुटूंबाची आठवण करत तिथेच कुजत असतो. येतात तुम्ही टोकदार भाला घेऊन आणि विकृतीने पिसाडलेल्या वृतीने घालतात ते आमच्या कातड्यात. काय वदना होतात हे तुम्हाला कसे कळणार. सोडतो जीव आम्ही घरच्याच्या आठवणीत. खुपसलेला भाला माझा जीव घेतो. माझ्यासाठी मागे असलेला माझा संसार त्याच काय होणार याचा विचार करतात का तुम्ही. माझ्या व्यक्तीगत स्वातंत्र्याचा लिलाव करण्याचा अधिकार तुम्हाला कुणी दिला ? माझा जगण्याचा अधिकार हिरावून घेतांना तुम्ही माणुसकीला काळिमा फासतात. तुमचा जीव जसा महत्वाचा आहे तसाच माझा पण आहे पण डोळ्यावर विकृतीची पट्अी असणाऱ्यांना कस कळणार ते. एकीकडे देव देवतांची पूजा करतात. दुर्गादेवीच्या वेळेस मलाही पूजता, सभ्य संस्कृतीचा ठेगा जगभर फिरवता पण मुळात जनावरा सारखे वागतात. तुम्ही लोकांनी आमच्या जंगलावर अतिक्रमण केलेत. आम्हाला आमच्याच जंगलात मोकळा श्वास घ्यायला जागा ठेवली नाही. आमचे सलग असलेले भ्रमणमार्ग तुम्ही तुमच्या विकासाने पिसाडलेल्या वृत्तीने संपुष्टात आणली. कधी शेतीकडे, गावांसाठी, औद्यागीकरणासाठी, हायवेसाठी तर खदानीसाठी आमचा जीव घेतला. उरल्यासुरल्या संरक्षित क्षेत्रामध्ये सुद्धा तुमचा धोका आम्हाला क्षणोक्षणी असतोच.

मी तोच वाघ बोलतोय जीो रस्ता ओलांडून माझ्या क्षेत्रात जाण्याचा प्रयत्न करतांना तुमच्या भरधाव गाडीने मी चिरडल्या गेलो. मी तोच वाघ बोलतोय ज्याला त्याच्याच जंगलात वीज प्रवाहाने मारले. मी तोच वाघ बोलतोय ज्याला त्याच्याच जंगलात वीज प्रवाहाने मारले. मी तोच वाघ बोलतोय जो तुम्ही लावलेल्या वनव्यामध्ये हतबल होऊन माझे निरागस बछडे जाळून खाक होतांना पाहिलेत. मी तोच वाघ बोलतोय जो तुमच्या अतिमहत्वकांक्षेमुळे अंस्ताला पोहचलायच आहे, मी तोच वाघ बोलतोय जो दुर्गादेवीचे प्रतिक आहे. स्वास्थ पर्यावरणाचे प्रतिक आहे. धैर्य आणि शौर्याचे प्रतिक आहे आणि आपल्या भारताचा अभिमान आहे पण या अभिमानाचा जीव तुमच्या मुठीत आहे . कधी शिकारीने तर कधी अपघाताने तर कधी आमच्याच रक्षण करत्याच्या हलगर्जीपणापुळे आमचा जीव जातो. माझे दोन बांधव पेंच च्या वनात अश्याच एका हलगर्जीपणापुळे मारल्या गेलीत. महाराष्ट्राच्या जंगलात एका वर्षात

वीज प्रवाहामुळे माझे ७ बांधव मारल्या गेली, नाही, त्यांची हत्या केल्या गेली आणि याला सर्वस्वी तुम्ही जबाबदार आहात. आम्हाला जर बोलता आले असते तर आम्ही ही आमच्या हक्कासाठी आंदोलन केली असती. उपोषणाला बसलो असतो. मागण्यापूर्ण करण्यासाठी रस्त्यावर उतरलो असतो आणि आमचे मत पडले असते तर आम्ही ही निवडणुकीत उभे राहीले असतो. म्हणायला आम्ही जनावर आहे पण वागणूक तर तुमची जनावरासारखी आहे, विकृत जनावरासारखी.

एका अशासकीय संस्थेच्या अहवालानुसार १९९४ ते २०१७ पर्यंत ११४७ वाघांची शिकार तुम्ही केलीत. २०१७ मध्ये भारतात शिकार व इतर मानवनिर्मित कारणाने ३७ तर २०१८ च्या सुरवातीलाच ६ वाघ तुम्ही मारलीत. हे नोंदणीकृत घटना आहेत, पण अशा घटना रोजच्या रोज घडत आहे. ज्या उघड होत नाही. एक दिवस पेपरला छापून येते, पर्यावरण प्रेमी फेसबुक व व्हॉट्स ॲप वर चर्चा करतात. अस करायला हवे तसे करायला पाहिजे पण वास्तविक मात्र शून्यच. दुसऱ्या दिवशी विसरून आपल्या आयुष्यात रममान होता. भौतिकतेच्या सुखाने हापापलेले तुम्ही मला मरण्याच्या उंबरठ्यावर पोहचलवयं, पण लक्षात असु द्या आमच अस्तित्व हे तुमच्या उज्वल भविष्याची देन आहे. आम्ही नसलो कि उरलेसुरले जंगले नष्ट होणार मग पाणी आणि शुद्ध हवेचे प्रश्न अधिक भेडसावणार. आताच तर तुम्ही कुठल्या न कुठल्या आजाराने ग्रस्त आहात. प्रदुषणातून तर तुमची सुटका तर नाहीच नाही. भौतिकतेच्या नादात तुम्ही अन्न, पाणी आणि शुद्ध हवा गमावलीच आहे आणि तुमच्या पुढच्या पिढीचे भविष्य अंधारात ढकलले आहेत.

महाभारतामध्ये लिहुन ठेवले आहे, वनातून वाघ नष्ट करू नये, कारण वनाशिवाय वाघ नाहीसे होतात आणि वाघाशिवाय वन तेव्हा समजून घ्या आमचा अंत जवळ आहे पण तुमचे ही भविष्य धोक्यात अहे. प्राणी, पक्षी, किटके, झाडे विरहित पृथ्वी कशी दिसेल याची कल्पना करा. वाळवंट होईल नुसता वाळवंट. जगणार फक्त तुम्ही तेही मरण्याची वाट बघत. भिंती असल्याने घर होत नसते त्याला घरपण हव असते. तसेच माणूस असल्याने पृथ्वी नसते. त्यामध्ये सर्व जीवांचा समावेश असेल तर त्याचे अस्तित्व असेल नाहीतर भकास निसर्ग तुम्ही तुमच्या पिढीला देऊन जाणार आणि ते तुम्हाला कधी ही क्षमा करणार नाही. आमच संरक्षण व संवर्धन करणे म्हणजे पर्यायाने इतर सर्व प्राण्यांचे संवर्धन करणे होय. ज्यामुळे तुमचे आयुष्य अधिकी सुखर, समृद्ध होईल आणि अज्ञानाने ग्रासलेले तुम्ही तुमच्या जीवावर उठले असाल तर त्याला मी तरी काय करणार.

एकोणीसशेच्या दशकामध्ये ४० हजाराच्या जवळ असलेली आमची संख्या तुम्ही चालवलेल्या जंगल तोड, हौशीसाठी शिकार, तुम्ही वाढविलेल्या अतिरिक्त गरजा, विकासासाठी तोडलेली वने यामुळे १९७२ पर्यंत ५ हजाराच्या खाली येऊन ठेपली. तेव्हा माझ्या सवंर्धनासाठी काही निसर्ग अभ्यासक व निसर्गप्रमींनी मा. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना माझे निसर्गातील महत्व पटवून दिले आणि माझ्या संरक्षण व संवर्धनासाठी व्याघ्र प्रकल्पाची घोषणा केली. धन्य ती माऊली जिणे आमचा जीव वाचविला. तरी आजची परिस्थिती वेगळी आहे. चांगली म्हणावी असे ४ ते ५ टक्के वने आमच्यासाठी आहे आणि त्यात आम्ही २२२६ वाघ २०१४ साली केलेल्या अभ्यासानुसार तग धरून आहोत. पण इथेही आम्हाला मोकळा श्वास नाही. अति पर्यटन, शिकार, वनवे, आमच्या वनातून जात असलेले हायवे आणि आतचा वीज प्रवाह आमच्या जीवावर उठलाय.

माझ्या ऐकण्यात आले होते की, हा देश गांधीच्या अहिंसेवर चालणारा आहे पण आम्ही तर नुसती हिंगसा होतांनाच पाहिली आहे. मुक्या प्राण्यावर दया करा असे सांगणारी तुमच्याच संताच्या विचारांची तुम्हीच पावलो-पावली हत्या करत आहात. भारतीय संविधानातील ५९अ कलमाद्वारे आम्हाला ही जगण्याचा अधिकार दिला आहे, असे लिहिले आहे म्हणे आणि तो अधिकार तुम्ही आमच्या पासून हिरावून घेता आहे आणि संविधानाचा अपमान करता आहे असे वाटत नाही तुम्हाला. मला शेवटी एवढेच सांगायचे आहे जेवढ्या वेगाने तुम्ही दिश्याहीन विकासाकडे धावाल तेवढ्याच वेगाने तुमचा अंत होईल. विकासाच्या वेगावर जर नियंत्रण ठेवले नाही तर उरले-सुरले वने नष्ट होईल. पाणी नसेले, अन्न नसेल आणि प्राणी विरहीत ही पृथ्वी उजाड-उनाड होईल आणि मग तुम्हीच तुमचे लचके तोडायला लागणार. मी ऐकले आहे तिसरे महायुद्ध लांब नाही म्हणून. आजच तशी परिस्थिती आहे. पाण्यासाठी घरोघरी, गल्लोगल्ली, गावोगावी, तालुका, जिल्हा, प्रांत, राज्य राज्यामध्ये आणि देश-देशामध्ये वाद चालू आहेत. आणखी याचा उद्रेक वाढत जाईल आणि नंतर तुम्हीच तुमचे लचके तोडायला धावणार. हा विकृतीचा विकास तुमच्या जीवावर उठणार.

काही प्रमाणिक अधिकारी, वन अधिकारी, कर्मचारी, अशासकीय संस्था, निसर्ग प्रेमी माझ्या संवर्धनासाठी नेहमीच तत्पर असतात. माझ्या शिकारीवर आळा घालणाऱ्या मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील अधिकारी व अशासकीय संस्थेच्या लोकांनी माझ्यासाठी जीवाची बाजी लावली. १५० पेक्षा अधिक शिकारी पकडून आम्हाला न्याय मिळवून दिला. वन विभाग जंगल परिसरातील शेतकऱ्यांना सोलर कुपन देत आहे असे समजले आनंद झाला, त्यांचे व आमचे प्राण संकटातून वाचविले त्यासाठी मी त्याचा आभारी आहे. आम्हाला शांततेने जगु द्या, वने राखा आणि येणाऱ्या पिढीला आमची, आमच्या वनाची, इतर सर्व जीवांची विरासत पोहचवा.

**प्रफुल्ल सावरकर**
शिक्षणाधिकारी, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी ,
मो. ८९२८९२९९२०

# काटेपूर्णा अभयारण्य



काटेपुर्णा अभयारण्य हे अकोला जिल्ह्यातील समृध्द वन्यजीव अधिवास असलेले क्षेत्र आहे. महाराष्ट्र शासनाने ८ फेब्रुवारी १९८८ मध्ये राखीव वन महसूल क्षेत्र व इतर क्षेत्राचा समावेश ७३.६९ वर्ग किमी क्षेत्र काटेपुर्णा अभयारण्य म्हणून घोषीत केले.

**काटेपुर्णा जैवविविधतेत उल्लेखनीय प्रगती वैशीष्ट पुर्ण झालेले अभयारण्य**

८ फेब्रुवारी २०१८ या दिनी काटेपुर्णा अभयारण्याचा स्थापना दिवस हा साजरा करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने अभयारण्याचे महत्व पटवून देण्यासाठी अकोला वासियांमध्ये पर्यावरण जागृतीसाठी हा लेख प्रसिद्ध करण्यात येत आहे.

प्रादेशिक वन विभागाकडून, शास्त्रोक्त वन्यजीव व्यवस्थापनासाठी हे अभयारण्य नविनच निर्मित अकोला वन्यजीव विभागाकडे १९९६ मध्ये विभागीय वनअधिकारी वन्यजीव अकोला यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आले. कोटेपुर्णा अभयारण्याचे व्यवस्थापन विभागीय वनअधिकारी वन्यजीव अकोला यांचेकडून व नियंत्रण मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक मेळघाट व्याघ्र प्रकल्प अमरावती यांचेकडे आहे.

काटेपुर्णा अभयारण्यात एक वनवर्तुळ असून पाच नियतक्षेत्रे आहेत. अभयारण्यात, अकोला शहरास पाणीपुरवठा करणारा काटेपुर्णा नदीवरील जलाशय आहे. वनक्षेत्र साग वृक्षाचे प्राबल्य असलेले पानगळीचे वने आहे. अभयारण्य आकाराने लहान व चहुबाजूंनी माववस्तीने वेढलेले असले तरी अभयारण्यात बिबट, तरस, कोल्हा हे मांसभक्षी व नियगाय, चितळ, भेकर, काळविट असे प्रमुख वन्यप्राणी आढळतात. यांचे संरक्षणाची तसेच त्यांचे अधिवासाचे शास्त्रोक्त पद्धतीने संवर्धनाची जबाबदारी अभयारण्य प्रशासनावर आहे.अभयारण्याचे व्यवस्थापनासाठी सन २०१३–१४ ते २०२२ –२३ या कालावधीसाठी व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला असून तो मंजूर झालेला आहे. अभयारण्यातील व अभयारण्याचे सिमेवरील राहणाऱ्या लोकांचे सक्रीय सहकार्य प्राप्त करण्यासाठी डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी जीनवन योजना राबविणे वनपर्यटनाचे विकासात्मक ग्रामीणांना रोजगार उपलब्ध करून देणे. वन्यप्राण्यांचे पिण्याचे पाण्यासाठी व अधिवास संवर्धनासाठी मोठ्या प्रमाणावर जल व मृदसंधारणाची कामे व अधिवास संवर्धनाची कामे प्रस्तावित करण्यात आली आहे. काटेपुर्णा अभयारण्याच्या सभोवतालच्या सर्व गावांच्या विकासासाठी खालीलप्रमाणे महत्वाची कामे राबविण्यात आली आहेत.

१. पर्यटकांना खाजगी वाहनातून जंगल सफारीसाठी रस्ते दुरूस्त करण्यात आले आहेत. त्यासाठी वाहन शुल्क आकारण्यात आले आहेत. त्यामुळे अकोला वासीयांना पर्यटनाची मोठी पर्वणी लाभलेली आहे.

२. पर्यटकांना निसर्ग पाऊल वाटेवर भ्रमंतीचा आनंद लुटण्यासाठी वाघा येथे धरण परिसरात २.७ किमी ची निसर्ग पाऊल वाट निर्माण करण्यात आलेली आहे. व त्यावर विविध जंगलाची माहिती दर्शविणारे सुंदर उद्‌बोधक माहिती फलक लावण्यात आले आहेत.

३. पर्यटकांना राहण्यासाठी ३ सुट तयार करण्यात आले असून २४ तास लाईटची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

४. वाघा येथे निसर्गप्रेमी व पक्षी प्रेमी विविध निसर्गाशी संबंधीत खेळ व प्रश्नमंजुषा या सारखे कार्यक्रम राबविण्यात येतात.

५. विविध सेल्फी पॉईंट वाघा परिसरात उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच जलाशयाच्या परिसरात सुर्योदय व सुर्यास्त पाहण्याची संधीही पर्यटकांना लाभली आहे.

६. निसर्ग प्रेमींना अधिक माहिती देण्यासाठी गावातील १० युवकांना गाईड प्रशिक्षण देण्यात आले असून त्यामुळे त्यांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

७. येणाऱ्या काळात बोटींग व सायकलींगचा आनंद घेता येणार आहे.

८. दर पौर्णिमेला अभयारण्यातील मचानावर बसुन वन्यजीवाच्या अधिवासाचा आनंद लुटण्यासाठी मचाण पर्यटनही सुरू करण्यात आले आहेत.

९. या तिन दशकपुर्तीच्या प्रसंगी काटेपुर्णा अभयारण्यातील वनकर्मचाऱ्यांनी जवळच्या गावामध्ये जनजागृती रॅली काढण्याचे ठरविलेले आहे. अकोलेकरांना पाणी देणार हे जंगल अकोला जिल्ह्याचा अभिमान आहे. त्यामुळे अकोलेकरांनी काटेपुर्णा अभयारण्याचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. हीच अपेक्षा जनसामान्याकडून करण्यात येत आहे.

# Katepurna

# काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्य








- अमरावती शहरापासून - ११० कि.मी.
- अकोला शहरापासून - ३२ कि.मी.
  (बार्शी टाकळी मार्गे)









15.

# DnyanGanga

# ज्ञानगंगा वन्यजीव अभयारण्य






बिबट

अमरावती पासून
**१७६ कि.मी.**
(मुर्तीजापूर, बाळापूर, खामगांव मार्गे)



निलगाय





भेकडी

DnyanGanga Wildlife Sanctuary

ज्ञानगंगा

वन्यजीव

अभयारण्य

मा. मुख्यवनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती यांच्या मार्गदर्शन व सुचनेनुसार खुप बदल अभयारण्यात सन २०१७ मध्ये झाले आहेत. त्याचा उल्लेख करणे क्रमप्राप्त आहे. वनसंरक्षणासाठी रस्ते दुरूस्ती सुमारे १०० किमी करण्यात आली त्यामुळे अभयारण्यातील प्रत्येक भागात जाणे सोपे झाले. जंगलात ठिकठिकाणी बॅरिअर्स बसविण्यात आले त्यामुळे अवैध वाहतूक थांबविणे शक्य झाले. यामुळे वन, वन्यजीव संरक्षणात विलक्षण बदल झाला व मोठ्या प्रमाणात अवैध वाहतूक, अवैध चराई थांबल्यामुळे जंगलात मोठ्या प्रमाणात जैवविविधता वाढली आहे. आता ज्ञानगंगा अभयारण्यात जैवविविधतेने समृध्द झालेले अभयारण्य म्हणता येईल.

# ज्ञानगंगा जैवविविधतेत उल्लेखनीय प्रगती वैशीष्टपुर्ण झालेले अभयारण्य

ज्ञानगंगा अभयारण्य हे खामगांव व बुलडाणा या शहरांपासून जवळ व या शहरांना जोडणाऱ्या रस्त्यालगत, अजिंठा पर्वतरांगेतील वन्यजीवांचा सुरक्षीत व समृध्द अधिकवास आहे. महाराष्ट्र शासनाने सन १९९७ मध्ये बुलडाणा जिल्ह्यातील २०३.५६ वर्ग किमी राखीव वनक्षेत्रासाठी ज्ञानगंगा घोषीत केले. दिनांक १३/१/१९९८ रोजी शास्त्रशुद्ध व्यवस्थापनासाठी अकोला वन्यजीव विभागाने या अभयारण्याचे अधिग्रहण केले. सध्या ज्ञानगंगा अभयारण्याचे व्यवस्थापन अकोला वन्यजीव विभागाकडे व नियंत्रण मुख्यवनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक मेळघाट व्याघ्र प्रकल्प अमरावती यांचेकडे आहे.

ज्ञानगंगा अभयारण्यात दोन वनपरीक्षेत्रे असून त्यांत सात वनवर्तूळ व २१ नियतक्षेत्रे आहेत. अभयारण्याचे सिमेलगत उत्तरेस पलढग व दक्षिणेस माटरगांव हे जलाशय आहेत. अभयारण्य क्षेत्र साग वृक्षाचे प्राबल्य असलेले पानगळीचे वन आहे. अभयारण्यातून खामगांव-बुलडाणा हा राज्य मार्ग जातो व अभयारण्य चहूबाजुंनी मानव वस्तीने वेढलेले आहे. तरी वन्यजीवांनी समृद्ध आहे. अभयारण्यात बिबट, तरस, रानकुत्रा, रानमांजर. अस्वल या मांसभक्षी, सर्वभक्षी वन्यप्राण्यांसोबतच निलगाय, भेकर हे तृणभक्षी व इतर सरपटणारे प्राणी हे आहेत. यांचे संरक्षणाची व त्यांचे अधिवासाचे सवंर्धनाची जबाबदारी अभयारण्य प्रशासनावर आहे.

अभयारण्याचे व्यवस्थापनेसाठी सन २०१५-१६ ते २०२४-२५ या कालावधीसाठी व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला असून तो मंजूर झालेला आहे. आराखड्यात वन्यजीवांचे अधिवास संवर्धनासाठी करावयाची विविध कामे प्रस्तावित करण्यात आली असून त्यांत ग्रामपरिसर विकास योजनेअंतर्गत, ग्रामिणांचा विकास व वन्यजीव संरक्षण, संवर्धननत त्यांचा सक्रीय सहभाग प्राप्त करणे, वन्यप्राण्यांचे पिण्याचे पाणी व खाद्यासाठी जल व मृद संधारणाची कामे तसेच कुरणविकास इत्यादी कामे मोठ्या प्रमाणावर घेणे, वनपर्यटनातून ग्रामीणांना रोजगार उपलब्ध करून देणे, मानव वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना प्रस्तावित आहेत.

भविष्यात या अभयारण्यात विविध योजना राबविण्यात येणार आहे.

१. पर्यटकांना खाजगी वाहनातून जंगल सफारीसाठी रस्ते दुरूस्त करण्यात आले आहेत. त्यासाठी वाहन शुल्क आकारण्यात आले आहेत. त्यामुळे बुलडाणा वासीयांना पर्यटनाची मोठी पर्वणी लाभलेली आहे.

२. बोथा येथे निसर्ग परिचय केंद्र दुरूस्ती, नक्षत्रवन दुरूस्ती, पर्यटकांची पाणी व्यवस्था, पर्यटकांची राहण्याची व्यवस्था, इत्यादी विविध सुविधा पर्यटकांची सन २०१७-१८, २०१८-२०१९ मध्ये करण्यात येणार आहे.

३. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी अंतर्गत एकुण १२ गावे निवडण्यात आले असुन सुमारे २२ लक्ष रूपये शासनाने त्यांच्या सर्वांगीन विकासासाठी जंगलावरील ताण कमी करण्यासाठी दिले आहे. त्याचा निश्चितच उपयोग वनसंरक्षण व संबंधितांना होणार आहे.

४. दर पौर्णिमेला अभयारण्यात मचाणवर वन्यजीव अधिवासाचा आनंद वन्यजीव प्रेमींना मिळणार आहे. त्यासाठी मचाण पर्यटन सुरू करण्यात येणार आहे.

५. विविध उद्बोधक फलक अभयारण्यात व नक्षत्रवनात लावण्यात येत आहे. त्यामुळे पर्यटकांच्या ज्ञानात भर पडणार आहे व त्यातून निसर्गाशी मानवाची जवळीक निर्माण करण्याचा प्रयत्न आहे.

For online safari booking
& accomodation visit
the website :
www.magicalmelghat.com

# Tiger My Best Friend

Aeroplanes do not land there. It is beyond the reach of Railways. Still it attracts large number of people, young and old. It is MELGHAT and the TIGER CALLING to say HELLO. This is the greatest attraction of Melghat forest. It is a call from the Hills of Melghat which one cannot resist.

I have been visiting Melghat Forest and hills intermittently over the last 40 years. The silent hills of Satpura Mountain ranges with the Tiger Reserve area is spread over 3600 sq km encompassing the Gugamal National Park, Melghat Wildlife Sanctuary and neighbouring rich deciduous Reserve Forests.

Square miles keep calling me and others time and again. The attraction is the beauty of Nature and the wild life therein, mainly the TIGER. With the present efforts of the Government and Forest Department on conservation of Tiger in the region, a day is not far away when this specie will grow in large number and roam freely in its abode.

**Mother Nature**

I climb a hill and sit silently and watch at the glory of mountains and nature. My senses become numb and sense of peace engulfs me. Birds hover high in the sky, carefree glide up and down. I hear crickets chirping incessantly and I try to spot them with my eyes. I fail. I feel how poor and weak I am as a human before the glory of nature. I sense the hills all around me are watching me. Plants and trees are laughing and dance as the wind blows, carefree in their sense of giving, giving all they have. Leaves dry and fall, life regenerates and new leaves show up. Fruits appear. Giving continues. I see Mother Nature laughing. My identity is dissolved in the vastness and wonder of Nature. A find myself engulfed with a sense of peace. To attain this, you have to walk again and again, as said by the great naturalist Henry David Thoreau.

**Tiger My Friend**

Sighting of tiger in and around Narnala Fort and the surrounding jungle is becoming a normal feature and it is a feast to the eyes and soul of human being that is us, to meet the king of forest and say hello!

Spotting the pug marks of wild cats and their siblings is a common factor we come across when we are




roaming the precincts of Narnala Fort. On my recent trek to Narnala Fort, the guide Sanju pointed out the pug marks of siblings of wild cats near Chandan Khora point. They seems to be more than one, and are roaming freely during the night, he pointed out. We were late by many hours and missed sighting them. I asked Sanju if he can take the appointment with the cubs to meet them and make friends. He laughed heartily at the idea. In nature there are no appointments, he said. You have to exert and if you are lucky, you may see them. Forget meeting them, he said. Tigers. Leopards and other wild cats roam around freely and many a times we hear their roaring sound during the night, he pointed out.

The very sighting of the pug marks gave us a feeling of walking along with them in the forest. They may not be of Tiger/Leopard but they are rightly called the king of the jungle.

**Sanju The Guide With Wealth Of Knowledge**

Sanju is an experienced guide. He has been trained for the work by the Forest Department, he pointed out and expressed wealth of knowledge about the flora and fauna of Melghat Forest treasury while we were climbing the Fort cross country. Nature has provided with wealth of medicinal plants which help in healing many ailments, cuts, bites of scorpions, preventing blood loss on application of the leaves etc. of certain plants when you get cuts and blood starts oozing fast. The forest is full of plants with tremendous medicinal value and helps pharmaceuticals in manufacturing modern

medicines. I was reminded of the good old days when we suffered from ailment of coughs, the old man helping our family used to bring adulsa-vasica (Adhatoda Vasica) leaves and prepare its juice and we were forced to drink it as medicine. It relieved us from the coughing and related problems though we disliked its test. **The oral administration of this medicinal herb normalizes kapha and pitta. It is pungent, bitter and astringent in action**.

**Nature Opens Up Its Treasury**

Roses and Tulips are the decorations of urban gardens and households. But even they short fall of the glory of the small but majestically standing flowers in Melghat forest. This can be viewed only when one is trekking the footage of the Melghat hills up and down. It is these tiny flowers in plenty which greet us and welcome us to the hills. Majestically moving from side to side, they tell us Nature's glory and reveal the mystery of life therein. The beauty of these tiny flowers is mesmerizing.

**Where Eagles Dare To Fly**

Birds are seen flying over Narnala Fort searching for the lost glory of the Fort! Their feathers found lying near Mahakali Gate tell a different story best known to these birds only. If one is lucky, one may come across a python moving fast in a serpentine way through the grass while you are crossing the hills through the forest. The grass bends making way to the great python passing through. Sanju the guide reveals that it must have been 15 to 20 feet long and must have recently passed through. We missed it land felt sorry but as told by the guide we were fortunate for being away from the great creature.

Colourful Butterflies hovering over the vegetation in large number present a heart capturing view and reveals the beauty and power of Nature. Melghat forest offers huge treasury of flora and fauna, the wild creatures, birds and bees. Even the tiny ants show an architectural craftsmanship in the construction of their abode on the ground earth. It is an engineering marvel. Even heavy rain fall and blowing winds do not disturb their structure and keep them safe to live.

**Respect For Nature: Our Top Most Priority**

Only we humans have to learn from them all and enjoy living life as they live happy and in its glory. Of course everything is not that easy and simple for them all. The law of Darwin, e.i. 'Struggle for existence and survival of the fittest'' applies here also. But the approach and treatment is different and not like us humans, philosophically speaking. Nothing therein destroys for the sake of destruction. There is no greed to amass anything. Using the present day lexicon there seems to be no political rivalry seen anywhere in Nature.

**Appreciation of Individuals and organisations**

Enthusiasts like Devendra Telkar, Honorary Wild Life Warden, are the source of strength to the trekkers and new comers who roam in the forest of Melghat to absorb its beauty and feel the power of Nature and the creatures therein. His work in preservation of wild life, especially tiger/leopard and other wild creatures as known to the Forest Department and other associates call for accolades and high appreciation. Members of Youth Hostel Association of India Akola Branch, specially Nehru Taraporevala, Uday Malse of Akola, to mention a few, who regularly organise Nature Study Camps in Melghat Forest every year and provide exposure of Nature and Wild Life to younger generation and many other organisations of Nature lovers need be mentioned here with great appreciation for their work. Work of Uday Vaze of Srusti Vaibhav Organisation call for special mention. Uday has a tremendous knowledge of flora and fauna, insects and creatures and wild life in forest. There are number of Individuals and organisations working in this direction and the Government Departments have strengthened their efforts. It is a healthy sign.

It is high time we understand Nature in its true sense if we want to survive, live a happy and healthy life. Preservation of Nature should be our topmost priority. This message when percolated through the young generation will allow us and them to live life as it should be lived by learning from Nature and its habitats.

**- Advocate Radheshyam Modi,**
Alsi Plots, Akola
Mobile: 9860660300

# चिखलदरा विदर्भाचे नंदनवण...

चिखदरा हे विदर्भातील एकमेव असे थंड हवेचे ठिकाण असुण ते सातपुडा पर्वत रांगांमध्ये वसलेले आहे.चिखलदरा हे समुद्रसपाटी पासुन मी. उंचीवर आहे व त्या ठिकाणी मी.मी.पाउस पडतो, त्यामुळे चिखलदरा येथील निसर्गरम्य वातावरण हा पर्यटकास आकर्षित करीत असते.पावसाळया मध्ये पडणारे दाट धुके ,नमीनी लगत वाहणारे ढग हे, तसेच वाहणारे धबधबे पर्यटकांना आकर्षीत करीत असतात. त्यामुळेच चिखलदरा येथील निसर्गरम्य वातावरण हा पर्यटकांना आकर्षीत करीत असते. पावसाळया मध्ये पडणारे दाट धुके ,जमीनीलगत वाहणारे ढग हे, तसेच वाहणाारे धबधबे पर्यटकांना आकर्षीत करीत असतात. त्यामुळे चिखलदराला विदर्भाचे नंदनवन असे म्हणतात.

चिखलदऱ्यामध्ये पर्यटकांना ठाकुर पॉइंट,लांग पाईट ,पंचबोल पाईट,देवी पाईट,भिमकुंड,देवी पाईट,आणि गाविलगडकिल्ला हे प्रमुख आकर्षक पर्यटन ठिकाणे आहेत.या सर्व ठिकाणांनाचा वेगळीच ऐतिहासिक पार्श्वभुमी आहे.पंचबोल या ठिकाणी नेहमी वाहणारा धबधबा हे पर्यटकांना लुब्ध करतात,तसेच या ठिकाणी मोठ्याने आवाज केल्यास,ओरडल्यास तो आवाज पाचवेळा ऐकता येतो,म्हणुन या ठिकानास पंचबोल पाईट म्हणतात.देवी पाईट हा साडेतिन शक्तीपीठा पैकी एक आहे.असलेलया कोल्हापुरची देवी महालक्ष्मी मंदीर असुन ते ऐका गुफे मध्ये आहे.या ठिकाणी पर्यटक देवीचे दर्शनाबरोबरच घोडेस्वारी,उंट सवारी चा लाभ घेतात.

वैराट सनसेट पॉइट हे मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील एक पुर्नवसीत ठिकाण असुन,या ठिकाणी अस्तमानाला जाणारा सुर्य पाहण्याकरीता सनसेट पॅाइट प्रसिध्द आहे. वैराट हे विदर्भातील सर्वात उंच ठिकाणी असुन ते समुद्रसपाटी पासुन ११८० मी उंचीवली आहे.वैराट गावास ऐतीहासीक पार्श्वभुमी असुन त्याचा उल्लेख महाभारता मध्ये आढळुन येतो.पांडव १२ वर्षाचे विजनवासामध्ये असताना त्यांचे वास्तव चिखलदरा आणि वैराट या परीसरामध्ये होता.त्यावेळी वैराट चा राजा विराट याने पांडवांना मदत केल्याचे तसेच तो महाभारता मध्ये पांडवा कडुन लढल्याचे उल्लेख आहे.भिम आणि किचक यांच्या युध्दाची सुरवात वैराट पासुन झाली व ते लढाई करीत करीत चिखलदराहुन २ किमी अंतरावर असलेले भिमकुंड येथे आले.भिमकुंड येथे भिमाने किचकाचा वध केला आणि त्या दरी मध्ये फेकुन दिले.ती दरी आजही किचकदरी म्हणुन ओळखली जाते. अशी अख्याईका सांगितले जाते.यावरुन या परिसरात किचकदरा हे नाव पडले पुढे त्याचा अपभ्रंश होउन चिखलदरा हे नाव कायम झाले.वैराट हे या ठिकाणी प्रसिध्द देवी मंदीर आहे,ते आदिवासी बांधवाचे श्रध्दा स्थान राहिलेले आहे.या मंदिराचे खाली एक गुप्त भुयार/सुरुंग असल्याचे सांगितले जाते.

चिखलदरा मधील गाविलगड किल्ला हे पर्यटाकाना भुरळ घालणारे एक ठिकाण आहे गाविलगड किल्ला हा सातपुडा पर्वत रांगेमधील चिखलदरा येथे समुद्र सपाटी पासुन उंची वर ठिकाण असुन त्याची उंची सुमारे ११०० फुट आहे . पुर्वी किल्ला बहमनी सुलतानच्या ताब्यात होता,तत्पुर्वी या डोंगरावर गवळी लोंकानी मातीचा काटे उभारला होता अशी अख्यायीका आहे.बहमनी सुलतानाच्या काळामध्ये सातपुड्याच्या संरक्षणासाठी शहाबुद्दीन अहमदशाहने हा बलदंड किल्ला बांधुन उत्तरेकडून होणाऱ्या आक्रमणाला पायबंद घालण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर हा किल्ला औरंगजेबाच्या ताब्यात आला. नंतरच्या काळात तो नागपुरचे राजे भोसल्यांच्या ताब्यात आला, त्यावेळी या किल्यावर बेणसिंह नावाचा किल्लेदार होता. त्या वेळी इंग्रजाबरोबर झालेल्या युद्धामध्ये बेणीसिंहाने अतुलनीय पराक्रम गाजवला. त्याच्या पराक्रमाची प्रशंसा जनरल सर जेस्पर निकोल्स यांनी आपल्या नोंदवहीत करून ठेवली आहे. सदर किल्ला १३ मार्च १९९३ मध्ये राष्ट्रीय संरक्षीत स्मारक म्हणुन घोषीत करण्यात आलेले आहे.

या गडास दरवाजे, राणीमहाल आणि या ठिकाणी २ तलाव आहेत. तसेच या ठिकाणी १० तोफा आढळुन येतात. गाविलगड किल्ल्यावरून तोफेचा मारा केल्यास त्याची रेंज अचलपुर पर्यंत होती सांगीतले जाते.चिखलदरा मधील पर्यटन ठिकाणे पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांसाठी चिखलदरा या ठिकाणी वनविश्रामगृह, सार्वजनिक बांधकाम विभागाचे विश्रामगृह, तसेच जिल्हा परिषद यांचे विश्रामगृह आहे आणि चिखलदरा येथे सुसज्ज असे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्या मालकीचे दोन रिसोर्टस् आणि सर्वसोयी युक्त सुसज्ज असे एकुण २६ खाजगी होटेल्स उपलब्ध आहेत. चिखलदरा हे नेहमीच पर्यटकांना आकर्षित करणारे प्रलोभनिय असे पर्यटन केंद्र बनलेले असुन ते नेहमी देशी-विदेशी पर्यटकांना आकर्षित करीत असते. म्हणुनच चिखलदरा हे विदर्भाचे नंदनवन म्हणुन ओळखले जाते. यामुळे विदर्भाच्या पर्यायाने महाराष्ट्राच्या शिरपेचामध्ये मानाचा तुरा खोचला आहे.

**लक्ष्मण अरूण आवारे**
वनपरिक्षेत्र अधिकारी,
चिखलदरा

# चिखलदरा एक अद्भुत विश्व...



मेळघाट एक अतभुत विश्वनिसर्ग आणि त्यात येणारे सर्व सजीव निर्जीव कसे असु शकतात हे अनुभवायला मिळाल मेळघाटात मुळ मेळघाट हे घाटाचे आगळ वेगळ विश्व आहे . या घाटांत मध्ये चोहो बाजुला जिवनातील गुन्तागुतीचे एक वेगळ जिवन बघायला मिळत ,याठिकाणी बरेच प्रकारचे जंगली प्राण्यांचे वास्तव आहे.हे सगळ जवळुन अनुभवाला मिळाला एक प्रकल्पा दरम्यान.

या प्रकल्पा दरम्यान मि जवळपास पुर्ण मेळघाट पिजुन काढला ते सर्वरक्षित असो.या प्रकल्पा दरम्यान एकता सर्वेक्षणास जात असताना नंदीपात्रात काहीतरी चुलभुल सुरु आहे.हे लक्षात आल. थोड थाबुन नाहित तर लक्षात आल एका साभार,हरिण ला जंगली कुत्र्यानी पकडलेले दिसल जिवन मरनाची झुज सुरू होती.जंगळी कुत्रे किंवा त्यांना ढोल पण म्हणतात हे भरपुर क्रुर शिकारी असतात.ते १५—२० कुत्र्याची टोली त्या साभरावर तुटुन पडली आणि जिवंतपणेच खाउ लागली हा एक अन्न साखळीचा भाग आहे.आणि आम्ही आमच्या कामाला निघालो.



दुपारची वेळ झाली पोट आवाज करायला लागल जवळ एक सवरक्षण कॅम्प होतो आणि बॅग मध्ये नुडल्सचे पॅकिट ठोड आराम कराच खायच आणि समोर निघायच , सोबत वन विभागांची टिय होतिच आम्ही ते बनवायला लागलो आणि ज्याचा आवाज आला कि झाडावर वाघ आहे सगळ सोडुन कम्प च्या बाहेर आलो कुठे आहे कुठे आहे करत समोर चालत निघालो आजुबाजुला पुर्ण हत्ती गवत होत आणि कमेरा ला लेन ची रेज कमी होती.थोड दुर जाउन बघतो तर तो वाही नसुन बिबट होता तो झाडावर मध्योमध बसला होता मि नकत फॅाटो काढता भरपुर जवळ गेलो त्या फॅाटो काढण्याच्या नादात समजल नाही एवढ जवळ एउन पोहोचलो आपण,नंतर समोर बघतो तर १०—१५ ढोल त्यानी या बिबट्याला पुर्ण घेरल होत ते कुत्रे मला बघुन मागे गेले त्याच वेळेच बिबट पण झाडाच्या खाली उतरुन कुठे तरी निघुन गेला.काहि क्षणात भरपुर काही घडुन गेल हापण निसर्गाच एक भाग आहे, परत तेच अनुभवाला मिळालं.

मनिष के. ढाकुलकर
८८०५००८८०३

# Magical चिखलदरा...

चिखलदरा हे मेळघाट व्याघ्र प्रकल्पामधील, गुगामल वन्यजीव विभाग परतवाडा अंतर्गत येणारे वनपरिक्षेत्र असुन ते विविधतेने नटलेल्या निसर्गरम्य अशा सातपुडा पर्वतरांगा मध्ये येते. चिखलदरा नगरामध्ये असलेल्या ठाकुर पॉईंट, लाँग पॉइंट, देवी पॉइंट, पंचबोल पॉइंट, भिमकुंड आणि गाविलगड किल्ला या व्यतीरिक्त मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील वनपर्यटन स्थळे ठिकाण चाटीबल्डा कॅम्प परिसर, वैराट पठार, सनसेट पॉइंट, हवाखांडी, सांभरबल्डा, मिर्चीबल्डा, हरणगोटाण ही प्रेक्षणीय स्थळे पर्यटकांना आकर्षीत करतात.

चिखलदरा पासुन वैराट सफारीस सुरूवात केली असता वनप्रशिक्षण संस्था चिखलदराचा परिसर संपताच चिखलदरा चाटीबल्टा कॅम्प परिसर रस्त्यावरती अस्वल, सांभर, खोकड हे प्राणी हमखास दिसून येतात. या सफारीमध्ये वाघ, बिबट दिसण्याची शक्यता कमीच राहते. परंतु त्यांच्या अस्तित्वाचे पुरावे पगमार्क, झाडावरील ओरखडे, विष्ठा, त्यांचे आलार्म कॉल्स इ. गोष्टी वाघाच्याआणि बिबटच्या अस्तित्वाबाबतचे पुरावे सहज देऊन जातात. कधी कधी भाग्यवान पर्यटकास वाघ आणि बिबटचे दर्शन ही होऊन जाते. परंतु तो त्याच्यासाठी कपिलाशष्ठीचा योग असतो. या प्रकारच्या सफारीमध्ये पर्यटकांना कोणत्याही प्रकारच्या प्राण्याचे दर्शन नाही झाले तरी वैराट सफारीतील विविध ठिकाणांचे नैसर्गीक व नयनरम्य वातावरण, आल्हाददायक व बोचरी थंडगार हवा आणि आपणा जवळून वाहणारे ढग हे आपण कुठे स्वर्गामध्ये तरी नाही ना? हा वेगळाच अनुभव देऊन जातो. या पर्यटन स्थळां व्यतीरिक्त चिखलदरा गाभा क्षेत्रातील विविध ठिकाणे देऊन जाते.

चिखलदरा–वैराट या रस्त्याने हवाखांडी हे ठिकाण येते, हवाखांडी मध्ये रस्त्याच्या दोन्ही बाजुस प्रचंड दोन दरीच्या मधुन जाणारा हा खिंडीचा रस्ता असुन, या ठिकाणी खालुन दरीमधुन येणारी थंडगार हवा, वेगळाच अनुभव देऊन जाते. त्यामुळेच या परिसरास हवाखांडी असे म्हणत असावेत. वन्यप्राण्यांना अवागमनाकरिता हा एकमेव मार्ग असल्याने या ठिकाणी वाघ, बिबटसह बहुतेक सर्व प्राणी पर्यटकांना पहावयास मिळतात. हवाखांडी हे मेळघाट मधुन वाहणाऱ्या चंद्रभागा या नदीचे उगमस्थान आहे. या व्यतीरिक्त चिखलदरा परिक्षेत्रातुन गडगा व सिपना या नदी वाहतात.

वैराटहुन कालुकुंडी ट्रॅकींग करीत जाणे (पायी जल) हा वेगळाच अनुभव असतो, कालुगुंडी पासुन सुमारे ७.५ किमी असलेली पुण्यांग गुफा प्रसिद्ध आहे. ही गुफा खुप मोठीअसुन गुफेच्या आतमध्ये एकाचवेळी ३०–४० लोक वास्तव्य करू शकतात. गुफेच्या वरून पडणारा शुभ्र धबधबा व त्याचे उडणारे तुषार हे रोमांचित करीत असतात. ही पुण्यांग गुफा वाघ व बिबट यांच्या प्रजनन कालावधीमध्ये तसेच पिलांचे संगोपन कालावधीमध्ये उपयोगी पडत असते. याशिवाय येथील बनाम, नांगरबक्कल, कोलामआम, साक्री, गदुआन, सरेलीवन ही ठिकाणे निसर्गाची किमयाच न्यारी असते याची प्रचिती देतात.

बेलकुंड येथील ब्रिटीशकालीन वनविश्रामगृह हे ब्रिटीश कालीन स्थापत्य कौशल्याची प्रचिती देते. बेलकुंड विश्रामगृह हे इ.स.१९०१ मध्ये बांधण्यात आलेले असून ते उत्तम स्थापत्य कलेचा नमुना आहे.या ठिकाणी वनविश्राम गृहापासुन १.५ किमी अंतरावरील प्रसिद्ध असा महादेव कुंडी धबधबा आहे. बेलकुंड विश्रामगृहापासुन २–३ किमी अंतरावरती ब्रिटीशकालीन पुल बांधलेले आढळुन येतात. हे पुल ब्रिटीशांनी इ.स. १८७३ मध्ये बांधले बाबतच्या नोंदी आढळुन येतात.आज सुमारे १५० वर्षानंतर सुद्धा पुलाची अभेदता आणि मजबुती पाहिल्यास, त्यांचे कालावधी मधील स्थापत्य कौशल्य सर्वश्रेष्ठ असल्याचे जाणवते.

निलकोहु धबधबा – कुंड ते रंगराव जोड या रस्त्यावरती निलीकोहु या ठिकाणाजवळ आढळणारा प्रचंड असा धबधबा निलकोहु धबधबा या नावाने प्रसिद्ध आहे.

रंगरंगराव जोड सिपनाखांडी या मार्गावर ब्रिटीशांनी उभारलेल्या पुरातन वनविश्रामगृह होते. सद्यास्थितीमध्ये या ठिकाणी ब्रिटीशांनी उभारलेल्या विश्रामगृहाचे फाऊंडेशन आज ही दिसुन येते. या ठिकाणापासुन २ किमी अंतरावरती ब्रिटीशकालीन विहीर आणि त्याचेवरती पवनचक्की बसवलेली आढळुन येते. या ठिकाणी अनिकटचे बांधकाम करून पाणी अडविलेले आहे आणि या अनिकटच्या जवळच काळावरती १०–१२ फुट व्यासाची विहिर खोदलेली आहे. या विहीरीतील पाणी पवनचक्कीच्या सहाय्याने रंगराव विश्रामगृहापर्यंत आणण्यात येत होते अशी आख्यायीका आहे.

चिखलदरा वनपरिक्षेत्रातील कोहा, कुंड, गुगामल संरक्षण कॅम्प परिसर त्याचे वैविधता जपतांना आढळून येते. या परिसरातुन वाहणाऱ्या नद्या वन्यजीव व पर्यावरण परिसंस्था टिकविण्याचे कार्य करीत असते. गुगामल, अंधेरी नाका या ठिकाणी असलेली अनिकट व कुंड येथील तलाव व त्यातील परिसंस्था राखण्याचे कार्य केले. गुगामल व सुकळी हेम्डा कॅम्प परिसरामध्ये रानपिंगळाचे अस्तित्व आढळून येते. सदर भागामध्ये त्याचे अस्तित्वाचे वाढीस पुरक वातावरण आढळुन येते.

चिखलदरा मधील पर्वत रांगा, दऱ्या खोरे, त्यातुन वाहणाऱ्या विविध नद्यांमुळे जैवविविधता जपली जातेय, त्यामुळे एकुण भौगोलीक आणि पर्यावरण स्थिती पाहता चिखलदरा म्हणजे जादुई नगरीच भासते.

**लक्ष्मण अरूण आवारे**
वनपरिक्षेत्र अधिकारी, चिखलदरा

# Visit Chikhaldara this Monsoon...

## The Only Hill Station of Vidarbha

# Melghat Tiger Reserve

## ATTRACTIONS OF CHIKHALDARA

- Bhimkund - Historical Water Fall
- Gavilgarh Fort - Historical Place
- Scenic Places & Sunset Point







*Make the best use of*

**Monsoon...**

**Magical Melghat**





Jungle safari in core Tiger Reserve.




Melghat Tiger Reserve, Camp road, Amravati.

# मेळघाट व्याघ्र प्रकल्प रायपुर वनपरिक्षेत्राची माहीती...

मेळघाट व्याघ्र प्रकल्प सिपना वन्यजीव विभाग, परतवाडा विभागा अंतर्गत असलेले क्षेत्र रायपुर वनपरी क्षेत्राच्या नावानी ओळखल्या जाते. या क्षेत्रामध्ये वन्यजीव वास्तव्य असुन जनु ही निसर्गाने वन्यजीव वारसा बहाल केलेला आहे. या क्षेत्रामध्ये मिश्र प्रजातीची झाडे असुन जास्त प्रमाणात सागवान प्रजातीचे झाडे आहेत. सदर जंगल दाट असुन येथील वातावरण रम्यमय आहे. पावसाळ्यामध्ये अस्वल, सांबर, भेडकी, चांदी अस्वल, मोर यांचे नंदनवन या क्षेत्रामध्ये नांदते या सर्वांमुळे पावसाळ्यामध्ये सर्व जंगल फुलून हसू लागते. या गाभा क्षेत्रामध्ये वन्यजीवांचे विष्ठा, झाडावरील ओर डी ट्रॅप, कॅमेरा फोटो, पाऊल खुना वन्यजीव अस्तित्वाची ग्वाही देतात.



**बोराठा बेडा कोल्हापुरी बंधारा :** रायपुर वनपरिक्षेत्राची ओळख असेलेला बोराठा बेडा बंधारा हा रायपुर परिक्षेत्रामध्ये बोराठा बेडा गावापासन १ किमी अंतरावर आहे. सदर बंधाऱ्याला पेराराडोह या नावानी सुद्धा संबोधल्या जाते. रायपुर वनपरिक्षेत्राअंतर्गत सदर बंधाऱ्याचे बांधकाम सन १९७६–७७ साली करण्यात आले असून सदर बंधाऱ्याची लांबी ७५ मीटर व उंची ३.९० मीटर इतकी आहे. सदर बंधारा खापरा नदीच्या पात्रावर बांधलेला असुन बंधाऱ्यामध्ये १२ महीने पाणी उपलब्ध राहते. सदर बंधाऱ्याची पाणी साठवायची क्षमता ही चांगल्या प्रकारे आहे. बंधाऱ्याचा उपयोग वन्यप्राण्यांबरोबर गावकरी यांना सुद्धा होतो.

बंधाऱ्यामधील पाण्याची क्षमता अधिक प्रमाणात वाढविण्याकरिता सिपना वन्यजीव विभागाचे मा. उपवनसंरक्षक डॉ. सुनिल शर्मा (भा.व.से.), यांनी अधिनियमाला वेधुन सदर ठिकाणाला भेटी देवून त्यांचे मार्गदर्शनाखाली सन २०१६ मध्ये बंधाऱ्याचे दुरूस्तीचे कामे करून लोखंडी दरवाजे बसवुन पाणी अडविण्याचे काम या परिक्षेत्रामधील वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपाल, वनरक्षक यांनी केली. त्यामुळे आजच्या स्थितीमध्ये सदर बंधाऱ्याच्या पत्रामध्ये २.७० मीटर उंच व २९० मीटर लांब पाणी साठविले आहे. या पाण्याच्या उपलब्धतेमुळे सदर ठिकाणाला वाघ, बिबट, तरस व इतर वन्यप्राणी हजेरी लावून जातात. सदर क्षेत्रामध्ये वन्यप्राण्यांचे वास्तव्य हे या ठिकाणाचे वैशिष्ट आहे. बंधाऱ्यामध्ये या पाण्याची साठविण्याची क्षमता वाढली असून पाणी चांगल्या प्रमाणात उपलब्ध आहे.

24.


वन विभाग द्वारा बनाया
बन्धारा खापरा नदी
सन १९७६-७७
कुल खर्च-९६५४०रु लबाई ७५मी उचाई ३.१०मी



25.















**बोरट्याखेडा कोल्हापुरी बंधारा...**









# मेळघाटच्या ढाण्या

नेहमी जंगलात फिरायला जायचो असाच तो दिवस होता. मात्र सकाळी परतवाड्यावरून निघालो तेव्हा पासुनच आज काही तरी वेगळं होणार अशा प्रकारचे विचार मनात अधामधुन उठत होते. याची सुरूवात झाली ती माझ्या गाडीचा टायर पंचर होवुन. पण ते घरी बर की गाडी परतवाड्यालाच पंचर झाली. आम्ही चार जण आणि गाड्या दोन, नंदकिशोर दुधे आणि सतिश दादा यांना समोर जायला सांगुन, मी आणि मनिष ढाकुलकर गाडी दुरूस्त करून येतो असे सांगीतले. आधी आमचा Blue Tail Bee Eater ची Photography करायला जायचा विचार होता. पण नंतर विचार बदलवुन चला मेळघाटचा चक्कर मारू असे ठरले. रात्री किती तरी प्लॅन केले पण व्हायच तेच होते. आम्ही टेम्ब्रुसोंडा, खटकाली मार्गे हरिसाल नंतर कोलकाज, सेमाडोह आणि जमल तर रायपुर असा मार्ग ठरवला. ठरल्याप्रमाणे आम्ही सकाळी ८ ला परतवाड्यावरून निघालो. जुन महिन्याला सुरूवात झाली होती तरी ही उन्हाचे चटके अंगाला झोंबत होते. पाऊस नेहमी प्रमाणे थोडा उशीराच हजेरी लावणार होता.

टेम्ब्रुसोंडा पार केले आणि घनदाट जंगलाला सुरूवात झाली. थोड्या दिवसात पाऊस येणार याची पुर्व कल्पना देणारा पेरते व्हा पेरते व्हा असा आवाज Common Hawk Cuckoo पक्षाचा. खोगडा ओलांडल्यानंतर मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे गेट आले. त्या ठिकाणी एक रस्ता खटकली मार्गे अकोट कडे जातो व दुसरा रस्ता हरिसाल कडे जातो. आम्ही हरिसाल कडे जाणाऱ्या रस्त्याची निवड केली आणि जे निवडल ते बरोबर निवडल याच समाधान प्रत्येक २००-३०० मिटर वर होत होते. कधी शिक्रा तर कधी जंगल आऊलेट तर कधी ब्राऊन फिश आऊल आडवा जायचा. त्यातल्या त्यात समाधन याच की ते आपले चांगले फोटो देऊन जायचे.

दुपारचे १२ वाजले होते. इक डे तिकडे फिरत थांबत हरिसालला पोहचलो, तो पर्यंत जेवणाची वेळ झाली. म्हणून हरिसालच्या एका ढाब्यावर जेवण करायचे ठरवले. जेवण करण्यात ३.३० वाजले. आता नेमके जायचे कुठे या विचारात असतांना हरिसाल रेंजचे राऊंड ऑफीसर श्री. देशमुख साहेब भेटले. नंदकिशोर व त्यांचा चांगला परिचय होता. त्यांनी आम्हाला थालदा कॅम्पला जायची परवानगी दिली. त्यांचा आभार वजा निरोप घेऊन आम्ही गाडी थालदा कॅम्पकडे वळविली. हरिसाल चौराकुंड कॅम्प कडे जातांना डावीकडे थालदा कॅम्प आहे. गाडी डांबरी रस्ता सोडून कच्च्या रस्त्याने लागली. जातांना आम्हाला ५ भेकडींनी दर्शन दिले. हा भाग घनदाट जंगलाला लागुन असल्यामुळे इथे वन्यप्राण्यांचा वावर चांगल्याच प्रमाणात आहे. थालदा कॅम्प पोहचलो तेव्हा दुपारचे ४ वाजले होते. उन्हामुळे घसा कोरडा पडला होता. कॅम्पवर दोन वनमजुर होते. पाणी पिता पिता जंगलात आल्यावर नेहमी जो प्रश्न विचारतो तो मी प्रभुदासला (वनमजुर) विचारला. इतने मे टायगर दिखा क्या ? त्या प्रश्नावर त्याच उत्तर हो होत. त्याने सात



दिवसा अगोदरच कॅम्पच्या खालच्या बाजुला दिड-दोन किलो मिटर वर वाघ पाहला होता.

आम्ही सर्वांनी तिथे जायचे ठरवलं. नाही वाघ तर मेळघाटच्या वाघाच पगमार्क तर दिसतील. असा विचार करून आम्ही थालदा कॅम्पचा मागचा उतार उतरलो. खाली उतरल्या बरोबर आम्हाला एक बैल दिसला. तो थोडा घाबरल्यासारखा वाटत होता. आम्ही विचार केला आपल्या जोडीदारापासुन वेगळा झाला असल्यामुळे घाबरला असेल. त्याला रस्त्याच्या बाजुला हाकलुन आम्ही समोर जायला सुरूवात केली. त्या रस्त्याने वन्यप्राण्यांचा वावर असल्याच्या खाणा-खुणा जागोजागी दिसत होत्या. चालता चालता मी प्रभुदासला विचारले तु या अगोदर वाघ कसा व कोठे पाहला होता. तो सांगु लागला मी याच रस्त्याने चौराकुंडला जात होतो, दुपारचे १२.३० वाजले असतील. मी रस्त्याने जातांना सहज म्हणुन नाल्यात उतरलो, बघतो तर एक मोठा वाघ पाण्यात बसलेला. त्यात मी एकटा, मी फार घाबरलो तसाच कॅम्प कडे वळलो असा तो सांगत असतांनाचा Barking Deer चा अलर्ट



कॉल आला. मी सर्वांना शांत रहायला सांगितले, तो आवाज समोरून आला होता. सर्वजण शांत होवुन हळुहळु समोर चालत होतो. चालतांना चुकून कोणाचा पाय वाळक्या पानावर पडला तर मोठा आवाज व्हायचा, त्यात मी त्यांच्या वर चिडायचो. अस करत करत आम्ही जवळपास १ किमी आलो. ज्या ठिकाणी प्रभुदासने वाघ पाहला होता ती जागा आता थोड्या अंतराव होती. तीथे एक Black Cap Monarch पक्षी झोपण्या अगोदर खाण्याची सोय लावत होता.आम्ही नाल्याच्या दिशेने वळलो, नाला जवळपास १५० फुटांवर होता. आत मध्ये आल्यावर मला २ फुट उंच झाड दिसलं, त्यात एक सुंदर फुल आलेल होत. आमच्या मनातला फोटोग्राफर पुन्हा जागा झाला. आधी नंदु मग मनिष व नंतर सतिष सर्वांनी त्याचे फोटो काढले. त्याता माझा नंबर सर्वात उशीरा लागला. आम्ही ज्याचे फोटो काढले ते झाड होते नाल्याच्या बाजुला, तसेच एक झाड नाल्याच्या उजव्या बाजुला दिसलं, मी त्याचे फोटो घेत होतो. तोच आमच्या डाव्या बाजुला १०० मिटरवर मनिषला एक अस्वल त्याच्या छोट्या पिल्लासोबत दिसली. त्यानी आम्हाला सांगितले पण मला फक्त मोठी अस्वलच दिसली. पिलु काही दिसल नाही. ते नाल्याच्या उजव्या बाजुच्या झुडपात गेल. आम्ही त्याला आणखी पाहता याव म्हणुन डोळ्यांना दुर्बीण लावली व कोठे काय दिसते ते पाहु लागलो. तोच एक मोठी पिवळीक्षार, अंगावर काळे उभे पट्टे असलेली, साधारण साडे तिन फुट उंच, ८ ते ९ फुट लांब अशी आकृती त्याच बाजुला जातांना दिसली. प्रभुदास तसाच कानाजवळ पुटपुटला, साहेब शेर ! मी हातातली दुर्बीण मनिष कडे दिली व कॅमेरा तयार केला. तोपर्यंत वाघ त्याच झुडपात गेला होता. सर्वांचे मन खट्ट झाले कारण, दहा वर्षात पहिल्यांदा मेळघाटचा वाघ पाहीला. परंतु त्याचा एक फोटो पण मिळाला नाही. वातावरण आपोआप शांत झाले कारण आम्ही ५ जण अस्वल आणि वाघाच्या समोर होतो. एक एक सेकंद मिनीटा सारखा वाटत होता. जवळपास १ मि. झाला असले, वाघ परत फिरला आणि सबुरीच फळ आम्हाला मिळालं. आम्हाला तर विश्वासच बसत नव्हता की मेळघाटचा वाघ झुडपात गेला आणि परत उघड्यावर आला. मी तसाच त्याचा फोटो काढला कारण तोच फोटो माझा रेकॉर्ड फोटो ठरणार होता. आम्ही सर्वजण नाल्याच्या वरचा बाजुला पाच फुट उंचावर उभे होतो. मी तशीच नाल्यात उडी घेतली माझ्या मागे नंदुने पण उडी मारली. सर्वजण नाल्यात उतरलो, तोच वाघाची नजर आमच्यावर पडली, त्याने मोठ्याने तोंड उघडून नाराजी व्यक्त केली. तेव्हा त्याच्या तोंडातले चार मोठाले दात व आत मधला लाल भाग स्पष्ट दिसत होता. त्याने घशातला गुर्र...असा आवाज केला व आमच्या कडे दुर्लक्ष करून समोर निघाला. हे सर्व जवळपास १ ते १.३० मिनीटात घडले. तेवढ्या वेळात मी त्याचे १५ फोटो काढले. पण दोन तिन फोटो सोडता सर्व फोटो अस्पष्ट आले. याचे कारण पहिल्यांदा मेळघाटचा वाघ (ढाण्या) पाहल्याची उत्सकुता आणि शरीराव थरथरण.

वाघ आमच्या डाव्या बाजुच्या जंगलात शिरला. ज्या

बाजुला तो गेला होता त्या बाजुला जायला रस्ता होता. आम्हाला त्याला आणखी पहायची व मला आणखी सुंदर फोटो काढण्याची संधी मिळणार होती. म्हणुन आम्ही धावतच रस्त्यावर आलो व सावधपणे त्या बाजुने चालायला लागलो. १०० मि. गेलो असु तोच वाघाचा परत आवाज आला. तो आवाज त्याच नाल्यातुन होता, म्हणुन आम्ही परत नाल्यात शिरलो. पाच जण सोबत असल्यामुळे आम्ही नाल्यात जायची हिम्मत केली. ज्याठिकाणी आधी वाघ पाहला होता त्या ठिकाणापासुन आम्ही मागच्या बाजुला १५० मिटर वर होतो. सर्वांन मते नाल्यात समोर जायचे ठरले. नंदु, मनिष, सतिष आणि प्रभुदास हे नाल्यातुन चालत हेते व मी नाल्याच्या वरच्या बाजुला चालत होतो. सर्वजण हळूहळू कानोसा घेत चालत होतो. ते अंतर आता ७० मिटर राहल असेल. सर्वांच लक्ष समोर होत तोच मनिष एकदम ओरडला ङ्ङ दादा खाली पाहा ङ्ङ मी थांबलो, खाली पहायची हिम्मत होत नव्हती. सर्व हिम्मत गोळा करून खाली पाहल.

समोर एक पांढऱ्या रंगाचा बैल अखेरचा श्वास घेत पडला होता. तो जोराने मान खाली आपटत होता. त्याच्या मानीवर चार दातांच्या खुणा स्पष्ट दिसत होत्या. पुठ्यावरच मांस लोंबकळत



होत. तेवढ्यात माझ्या उजव्या बाजुने वाघाने गुर्र असा आवाज केला. माझेत र सात गेले आणि पाचच राहीलेत. मला व प्रभुदासला तो आवाज स्पष्ट ऐकु आला, तसाच मी सर्वां सांगीतले वाघ या बाजुला आहे म्हणुन. ते अंतर ३० ते ३५ फुटाचे असेल. त्या ठिकाणी रायमुनीची दाट झुडपे होती. तोच त्याने परत आवाज केला, हा आवाज आधीच्या आवाजापेक्षा मोठा होता सर्वांनी तो आवाज ऐकला होता, सर्वजण हळूहळू मागे सरकायला लागलो. वाघातल व माझ अंतर आधीच कमी होत, आणि त्यातल्या त्यात आम्ही त्याच्या शिकारी जवळ होतो. त्याने जर मनात आणले असते तर तो २ झेपेत माझ्यापर्यंत पोहचु शकला असता व ही घडलेली गोष्ट सांगण्याची संधी पण त्याने मला दिली नसती. पण त्याने असल काहीच केल नाही. माझी छाती धडधड उड्या मारत होती. पोटात गोळा आला होता, पाय थरथर कापत होते, काना मागुन घाम निघत होता. माझी नाही तर सर्वांची हिच परिस्थती होती. त्यातल्या–त्यात त्याच्या अगदी जवळ मी होतो.

नंतर आम्ही त्याच्यापासून सुरक्षित अंतरावीर नाल्यातच मागे चालत गेलो आणि अशा ठिकाणी उभे राहीलो जेथुन आम्हाला तो मारलेला बैल दिसेल. एवढ झाल्यावरही वाघ पहायची इच्छा मनातुन काही जात नव्हती. अर्धा तास वाट पाहली पण वाघोबा काही बाहेर फिरकले नाही. अंधार पडत होता, सायंकाळचे ५.४५ वाजले होते. आम्ही परत निघालो, जातांना सर्व प्रसंग परत आठवला व संपुर्ण कहानी लक्षात आली.

कॅम्पच्या खाली जो बैल दिसला होता तो त्या मेलेल्या बैलाचा जोडीदार होता. जेव्हा वाघाने त्याच्या सोबत्यावर हल्ला केला तेव्हा दुसरा बैल तेथून पळुन कॅम्पकडे आला. अशा परिस्थितीत सर्वच प्राणी मनुष्य वस्तीकडे किंवा जेथे माणसांचा वावर आही मिकडे धाव घेतात. म्हणुन तो कॅम्प कडे आला होता. वाघाने जेव्ह ा बैल मारायला सुरूवात केली तेव्हा तेथे अस्वलआली. तो अस्वलीला हुसकावुन लावायला तिच्या मागे धावला तेव्हा आमच्या दृष्टीस पडला. परंतु येथे एक गोष्ट आवर्जुन सांगाविशी वाटते, आम्हाला जर ते फुल दिसल नसत आणि आम्ही त्याचे फोटो काढले नसते तर आम्ही वाघ व अस्वल यांच्या मध्ये सापडलो असतो. कारण प्रभुदासने त्याच ठिकाणी आधी वाघ बघीतला होता व आम्ही त्याच ठिकाणी वाघाचे पगमार्क काढायला जाणार होतो.

पण काही का होईना मेळघाटात वाघ पायदळ जावुन पाहण्याची माझी इच्छा या मेळघाटच्या ढाण्याने पुर्ण केली त्याबद्दल मी त्याचा व प्रभुदासचा आयुष्यभर ऋणी राहील. सद्या स्थितीत प्रभुदास या जगात नाही पण त्याचे नांव ही कथा जेव्हा जेव्हा आठवेल तेव्हा तेव्हा आमच्या सर्वांच्या स्मरणात राहील.

**धन्यवाघ !**

# Love Your Work

One of the timeless secrets to a long happy life is to love your work. The golden thread running throuw the lives of history's most satisfied people is that they loved what they did for a living. Spending your days doing work that you find rewarding, inellectually challenging and fun will do meore than all the spa vacations in the world to keep your spiritis high and your heart engaged. Thomas Edison, a man who recorded 1093 patents in his lifetime, ranging from the photography, the incandescent light bulb and the microphone to the movies, had this to say about his brilliamt carreer at the end of his life, " I never did a day's work on my life, it was all fun. When you love you job, you discover you will neveve have to work another day in your life. Your work will be play and hours will sleep away as quickly as they came.

Earlier I have feelings that i am selected on this post though I am not all intended to , how can i manage the things but Melghat days brought some magnificient changes in my life. After joining here I came to know the atctual meaning of famous saying " Work is worship" is that to especially I learned how to walk in the forest and how to read the forest. Senior officer's guidence as catalyst for affection towords work.

Now I can say forest service is the best service for me, because it taught me how to serve others and get mental satisfaction out of it and all this service provides me the opportunity to serve the almightyy too.

The master in art of living makes little distinciton between his work and his play. his labour and his leisure, his mind and his boddy, his information and his recreation, his life and his religion. He hardly knows which is which. He simply purses his vision of excellence he does."

**- Kamlesh Patil**
Range Forest Officer



## ९ वन्य जिवांमध्ये

# मुंगीचे अनन्य साधारण महत्व



वन्यजिवामध्ये मुंगी ही दुर्लक्षीत आहे. पण हिला दुर्लक्षीत करुन चालणार नाही.मुंग्या या अनेक जातीच्या आहेत.लाल ,काळी,पांढरी, पाद्रमुंगी,तेलमुंगी,मुंगळा,उधळी एवढेच माहित होते पण प्रत्याक्षात मुंगाच्या दहा हजार जाती आहेत.पावसाळी प्रदेश व वाळंवटी प्रदेशमध्ये मुंग्या आहेत. फक्त दक्षिण धृवीय प्रदेशात आणि उत्तर धृवीय वर्तुळात मुंग्या आढळत नाहीत.किमान ९ कोटी वर्षापुर्वी पासुन मुंग्या पृथ्वीवर अस्तित्वार आहेत. प्रत्येक वन्यजीवांना अन्न व निवाऱ्याची अत्यंत गरज असते.पण प्रत्येकाचे,अन्न व निवारा वेगवेगळ्या प्रकारचा असतो.त्यात मुंग्याहि आल्याच मुंग्याच्या निवाऱ्याला मुंग्याचे वारुळ संबोधितात हे बांधण्याचे कसबहि वेगवेगळ्या जातीच्या मुंग्याचे भिन्न भिन्न असलेले दिसुन येते. हे वारुळ प्रत्येक अभयारण्यामध्ये जमिनीवर किंवा झाडावर वेगवेगळी असलेली दिसुन येते.काही जमिनिवर उंच उंच टोकदार भिंती बांधुन वारुळ तयार करतात.काही जमिनीवर वारुळ तयार करतात.जमिनिवर पण टेकडी तयार करुन वर गोल,गोल अनेक छिद्र ठेवतात. काही झाडाच्या फादीवर अगदी झुंबर लटकविल्या प्रमाणे वारुळ बांधतात. ते कुठेहि बांधो पण मानवाला विचार पडावा असे ही वारुळाची रचना अचीबंत करणारी निचीत आहे.

मुंग्यापासुन मानवाला शिकण्यासारखे बरेच काही आहे. मुंग्याचे संघटन कौशल्य,संकलन कौशल्य,त्याच प्रमाणे उत्कृष्ट असे मॉडेल होय.त्याच प्रमाणे हे दिशादर्शकहि आहे.त्याच प्रमाणे हे दिशादर्शकहि आहे.त्याचे असे की या वारुळाचे तोंड हे पुर्वेकडे उतार काढलेला असतो. अभारण्यामध्ये आपण भटकंतीला गेलो आणि दिशा विसरलोतर वारुळ शोधुन आपण आपली दिशा ठरवु शकतो.आपण कोणत्या दिशेकडुन आलो आणि आपल्याला कोणत्या दिशेकड जायचे आहे.अचुक समजेल म्हणजे वारुळ दिशादर्शक आहे.या वारुळाची रचना चक्रव्युहा सारखी आहे.म्हणजे शत्रु या वारुळामध्ये जाउ शकत नाही.ते ऐवढे गुळगुळीत असते. कि पाण्याच्या एक थेंब जरी पडला तरी मो घरंगळत बाहेर फेकला जातो. म्हणजेच पावळ्यात सुध्दा हे वारुळ टिकुण राहते.पावळ्यात मुंग्याना बाहेर पडायचे असल्यास त्या वारुळावर काळया रोहतात पावसाचे पाणी वारुळावर आले कि या काळ्याच्या पुलासारख्या उपयोग त्या घराबाहेर पडण्यासाठी करतात.या वारुळामध्ये ८ हटस असतात.म्हणजेच ३मीटर पर्यत आत हे वारुळ खोल पसरलेले असते.त्यामुळे अभयारण्यामध्ये उकरी द्यायचे काम मुंग्या कडुन होत असते.त्यात राणी मुगी सर्वात आत.पहाकरी अंडी ठेवायसाठी,अळी ठेवायचे दालन असे वेगवेगळे दालन असतात.प्रत्येक वारुरामध्ये एकतरीसाठी मुंगी असते.हि आकाराने इतर मुंगी पेक्षा थोडी मोठी असतात.ती सतत अंडी द्यायचे काम करते. कष्टकरी मुंग्या राणी मुंगीची काळजी घेतात.शिपाई मुंग्या हया लढावु असतात म्हणुन त्याचेस्थान वारुळाच्या तोंडाशी असलेल्या दालनात असते.या वारुळामध्ये २०० कि.ग्रॅम धान्य साठवुन ठेवण्याची क्षमता असते. वारुळाच्या तळाशी काळजी पुर्वक जमा केलेला धान्यावर त्या जगतात. हजारो मुंग्या हे वारुळ मिटर आत खोल असुन गारीच्या दगडानी वाळलेला पानानी उब राखल्या जाते. या मध्ये पावसाचे पाणी अजिबात जात नाही मात्र हवा ,उजेड,आत पर्यत पोहचयांचे शौच्छालयाची एका कोपऱ्यात जागा ठरलेली असते.मानवा सारख्या त्या कुठेही घाण करीत नाहीत.त्याच प्रमाणे आतला कचरा बाहेर टाकायचे काम सफाई कामगार मुंग्या करतात.

पावसाचे आगमन मुंग्याना आधिच कळते.मुंगीच्या खोलीची देखभाल शिपाई मुंग्यांकडुन केली जाते.दासदासी त्यामध्ये कुचराई करित नाहीत पुर्व आफ्रीकेच्या काही मुंग्या व्हिस्लींग थॉर्न या जातीच्या मुंग्या बाभळीच्या झाडावर राहतात.चार वेगवेगळ्या जातीच्या मुंग्या या झाडावर राहत असतात या झाडांच्या काही लांधा त्यांनी कुरतडुन तोडल्याचे अभ्यासकांला आढळले.बाभळीच्या लाध्या येजारच्या दुसऱ्या जातीच्या झाडाला जिथे स्पर्श करण्याची शकता होती तेथेचे लांघा कुरतडल्या होत्या आपल्या झाडावर दुसऱ्या झाडांनी आक्रमण करु नये म्हणुन झाडावरील मुंग्या स्वतच्या संरक्षणासाठी दुसऱ्या झाडाशी संपर्क येईल अशा प्रकारच्या लाद्याच्या पुल तोंडुन टाकतात आणि आक्रमणाची वाट बंद करुन टाकतात.मुंग्याही शेती करतात.लिजीमधल्या एकाबरोबर अनोख्या मुंग्या आढळुन आल्यात या मुग्या चक्क कॉलीच्या बियांची लागवड करतात.कॉलीच्या बियांची पेरणी केल्यावर रोपटयाची वाढ होईपर्यत मुंग्या सतत देखभाल करतात.लिहीडस या नावाने जात ओळखली जाते.कॉलीच्या रोपटयामध्ये त्या घर करतात.इथेच राहु लागतात. स्वतसाठी सुगंधी निवासाची सोय करणारी मुंग्यांची हि पहिलीच जात होय. असे वनस्पती शास्त्रज्ञ सुझॅन रॅनर सांगतात. बराच काळ लोटल्यावर त्यांच घर तयार होत आणि त्या आपला मुक्काम हलवतात. नव्या घरात रहायला जायला त्यांना पाच महिण्याचा कालावधी लागतो.

एवढीशी मुंगी पण एवढ्या मांठया हत्तीचे मरण मुंगी चावल्याने होते म्हणतात. म्हणुनच हत्ती जागा फुकुन चालतो असे म्हणतात.

**सौ. शालिनी कावरे**
निसर्ग प्रेमी,वृत्त छायाचित्रकार , अमरावती
मो.न. ९३७३९७७९९०

# डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजने अंतर्गत ४८ गावांची निवड करण्यात आली.

| गुगामल - ०९ | सिपना - १० | अकोला - १५ | अकोट - १४ |
|---|---|---|---|


शेती उपयोगी अवजारे वाटप


एल.पी.जी. गॅस वाटप


सौर उर्जेवर चालणारे स्ट्रिट लॅम्प


हॉस्पीलीटी प्रशिक्षणार्थी व प्रशिक्षक


गॅबीअन बंधाऱ्यांचे बांधकाम


बांगडी बनविण्याचे प्रशिक्षण


विहीरीचे बांधकाम


सौर उर्जेवर चालणारे दिव्याचे वाटप

**या व्यतीरिक्त योजने अंतर्गत अनेक कामे करण्यात आले.**

# Wildlife Crime Cell

**Nodal Officer -**
Field Director,(Melgat Tiger Reserve)

**Nodal Person -**
DFO (MTR)

**Assistants Operators -**
Regular F.G.



Wildlife Crime Cell
Melghat Tiger Reserve
|| वन्य प्राणिनाम रक्षार्थ समर्पितः ||

* २०१३ मध्ये झालेल्या ढाकणा येथील वाघ शिकार प्रकरण या मध्ये मेळघाट व्याघ्र प्रकल्प सायबर सेलच्या मदतीने संपुर्ण भारत भरातून अनेक आरोपी पकडण्यास आले व या मध्ये मिळालेल्या आरोपींना शिक्षा देण्याकरिता त्यांच्या मोबाईलचा जो काही डाटा सायबर सेल द्वारे काढण्यात आला त्या बाबत संपुर्ण डाटा कोर्टात हा एक पुरावा म्हणुन दाखल करण्यात आला व त्याबाबत वाघ शिकार प्रकरणातील संपुर्ण आरोपींना ५ वर्षा पर्यंतची शिक्षा कोर्टानी सुनावणी केली.
* सदर सायबर सेल हे मेळघाट व्याघ्र प्रकल्प करिता काम न करता संपुर्ण भारत भर ज्या काही वन्यजीव केसेस होतात त्या मध्ये लागणारे मोबाईलची माहिती किंवा आरोपीचे लोकेशन जाणून घेण्याकरिता संपुर्ण वनविभागात मदत करत आहे. अशा प्रकारे सायबर सेलच्या मदतीने संपुर्ण भारतातुन १९७ आरोपी आता पर्यंत पकडण्यात आले आहे.
* सायबर सेल कडून वन विभागाला मिळणारी माहितीचा खालील प्रमाणे तपशिल.

| | | | |
|---|---|---|---|
| Types of Cyber - Data → | **CDR** Call Data Record | **SDR** Suscriber Data Record | **TDD** Tower Dump Data |
| **IMEI** Servelinece | **CAF** Verification Documents | **LTL** live Tower Location | **Interception** |

# मेरा प्यारा मेलघाट....

यु तो गुजरी है जिंदगी,
हजारो गलियों से हमसफर,
जो जन्नत – ए – बहार है,
बस... एक तु ही मेलघाट है ।

तेरी खुशबु से महकती है कलीयाँ,
पंछियो की गुनगुनाहट से चहकती है गलियाँ,
जहाँ चाँद सितारों का हँसी बसेरा हैं,
जो जन्नत – ए – बहार है,
बस... एक तु ही मेलघाट है ।

आरजु है जिंदगी की,
कुछ पल तो बिताये यहाँ,
बाघों का है बसेरा, हर मोड पर जहाँ,
घाटीयो मे लहराती जो नागीन सी चाल है,
जो जन्नत – ए – बहार है,
बस... एक तु ही मेलघाट है ।

बहते हुये झरणे, ये खिलखिलाती नदियाँ,
मेलघाट की बाहो में, ये मोहब्बत की वादियाँ,
तु ही इस जमीं का बाघ – ए – आफताब है,
जो जन्नत – ए – बहार है,
बस... एक तु ही मेलघाट है ।
एक तु ही मेलघाट है.....

– संदिप ना. खंडारे
वनरक्षक, नि.नि.सं.मे.व्या.प्र. अमरावती.



# उंच उंच असतोस तू...

उंच उंच असतोस तू, रंगांचा अलंकार तू
निर्मिती नभांची तू, विजांचा कडकडाट तू
देखणे सुर्याचे रूप तू, गारव्याचा दानदाताही तू
उन–सावलीचा खेळ तू, पावसाची चिंब सरही तू
उंच उंच असतोस तू.....

तारांगण तारकांचे तू, साक्षीदार पौर्णिमेचा तू
नजरेचे सौंदर्य तू, टेकतांना दिसतोस तू
दिवसाचा प्रकाश तू, रजनीचा राजाही तू
भास अन आभास तू, मृगजळासारखा आहेस तू
उंच उंच असतोस तू......

सृष्टीचे सर्व सौंदर्य तू, चराचरात धनवाने तू
देखव्या रूपाचा कुमार तू, जगण्याचा माझ्या अर्थ तू
अर्धांनाही माझ्या संदर्भ तू, रोम–रोमात कसा भीनलास तू
आत्म्याच्या माझा गर्भही तू, परमधाम जाण्याचा मार्गही तू
उंच उंच असतोस तू......

- विलास देशमुख
सर्वेअर, मेळघाट व्याघ्र प्रकल्प





# मेळघाट बदलतोय....

होय बदलतोय, संपुर्ण एक वर्षाच्या कालावधिमध्ये, वनसंरक्षक, पर्यटन विकास, ग्रामपरिस्थितीकीय विकास समिती मार्फ त लाईव्हलीकु ड इम्प्रुकृमेंट माध्यमातुन जनसामान्याचा जिवनस्तर उंचविण्याचे प्रयत्न शासकिय कर्मचारी कल्याणाकारी कामे इ. गोष्टींचा सखोल अभ्यास केल्यास निश्चित लक्षात येते की, मेळघाट बदलतोय....

## १) वनसंरक्षक विषयक कामे

मेळघाट व्याघ्र प्रकल्पामध्ये यापुर्वी पारंपारीक पदध्दतीने वनकर्मचारी गस्त व वनसंरक्षणाची कमे करीत असत, यामध्ये कोणता कर्मचारीने कोठे गस्त केली याबाबत निश्चित मोजमाप पुजा येत नव्हते. तेव्हा जुन २०१७ पासुन संपुर्ण मेळघाट व्याघ्र प्रकल्पामध्ये गस्त सुरु करण्यात आली, त्यानुसार प्रत्येक कर्मचारी त्यांचे नियतक्षेत्रामध्ये प्रत्येक सप्ताहामध्ये ३० कि.मी गस्त करित असतो. मध्ये वनर्कचारी संर्पुबीट मध्ये गस्त करित असतात. त्यामुळे नवसंरक्षणाचे संरक्षणामध्ये वाढ झाली. गस्त करित असतांना मिळणारा डाटा करुन आढळणारे प्राणी व अवेध बाबींचे शास्त्रीय दृष्टिने विश्लेषणा करणे शक्य झाले, ज्यामुळे वनक्षेत्राचे व्यवस्थापन करण्यात मदत झाली.

अवैध अतिक्रमणा निर्मुलन सन २०१७-१८ मध्ये मे.व्या.प्र मधील गुगामल वन्यजीव विभाग, परतवाडा अंतर्गत येणाऱ्या वनपरिक्षेत्र हरिसाल मधिल हरिसाल, मांगीया, शेरा, चौंराकुंड. तांगडा वमालुर तसेच तारुबांदा नवपरिक्षेत्रातील एकुणा १५० हे. क्षेत्रातील कास्तगारांनी /शोतकऱ्यांनी केलेले अतिक्र मण निर्मु लन वन्यजिव विभाग परतवाडा चे कर्मचाऱ्यांनी केले आणी अभयारण्य/राष्टीय उद्यान क्षेत्रास अतिक्रमणाचे विळाख्यातुन मुक्त करणयात आले. सदर क्षेत्रामध्ये सलग समतलचर खोदणयाचे काम करुन वनजमीन ताब्यात घेण्यात आली.

अवैध गुरे चराई पिढ्या न पिढ्या अवैधा चराई करणारे गवळी समाजाचे लोक मे.व्या.प्र क्षेत्रामध्ये अवैध चराई करत असत मा. क्षेत्र संचालक तथा मुख्यवनसंरक्षक यांचे मार्गदर्शनाने तसेच मा. उपवनसंरक्षक गुगामल वन्यजीव विभाग परतवाडा मा. उवल सिपना वन्यजिव विभाग परतवाडा अकोट वन्यजिव विभाग अकोट यांचे नेतृत्वामध्ये मेळघाट व्याघ्र प्रकल्पामध्ये नियमीत गस्तीकरुन अवैध चराई करणारे व्यक्तींना पकडुन त्यांचे विरुध्द वनगुन्हे दाखल करण्यात आले. व्याघ्र प्रकल्पाचे अव ैध चराई करणाऱ्यांन कडुन मोठया प्रमाणावर दंड वसुल करण्यात आला. गुगामल वन्यजीव विभागातील फक्त चिखलदरा नवपरिक्षेत्रा मधुन ५२३०००/रु हरिसाल वनपरिक्षेत्रातुन अंदाजे, ढाकणा १८३०००/रु दंड वसुल करण्यात आले. खोंगडा येथील श्री तहादेव लक्ष्मणा बावस्कर यांत त्याचे ३१ जनावरांसह अवैधा गुन्हे चराई करित असतांना अटक केल्यानंतर त्यास वनकोठडी घेतल्यानंतर, न्यायालयीन कोठडीमध्ये तीन दिवसांसाठी केंद्रीय कारागृह येथे

पाठविण्यात आले. व त्यांच्या विरुध्द न्यायालयामध्ये दोषारोपपत्र करण्यात आले. याप्रमाणे वेगवेगळे वन विभागामधुन कार्यवाही करुन अवैध चराईस रोखणयात आली.

वनवणवा नियंत्रक वनवणवा नियंत्रनाकरीता पारंपारीक तंत्राचा वापर न करता अत्याधुनिक तंत्राचा वापर करण्यास सुरुवा झाली.नेहमी प्रमाणे पारंपारीक रित्या वनवणावा नियंत्रणकरिता झाडाच्या फांदीच्या सहाय्याने आग विझविणो जिकरीचे जात असे, त्या ऐवजी फायर ब्लोअर्स च्या वापरास सन २०१६—१७ पासुन सुरुवात करणयात आली. या फायर ब्लोअर्स मुळे कमीत कमी मनुष्यबळाचे सहाय्याने आग विझविणो सोईस्कर झाले. आग नियंत्रणाकरीत अग्नीरक्षकाची नियुक्ती करण्यात आली.

### अवैध शिकारीस नियंत्रण –

अवैधा शिकारीस आळा घालणे करिता क्षेत्रीय कर्मचारी अणि विशेष व्याघ्र संरक्षक दलाच्या सहाय्याने नियमीत गस्त करण्यात आली. अवैध शिकारीचे वेगवेगळे गुन्हामधये आरोपीस अटक करुन त्याचे विरुध्द कार्यवाही करुन प्रकरणा न्यायालयात सादर करण्यात आले. ढाकणा रानड्कर प्रकरण, डोलार सांभर शिकार प्रकरणी आरोपीस अटक करुन त्यांचेविरुध्द कार्यवाही करण्यात आली. तसेच सिपणा वन्यजीव विभागामधील गवा शिकार प्रकरणामध्ये मे.व्या.प्र. मध्ये प्रथमच गवा शिकारी करणारे आरोपीस अटक करुन त्यांच्यावर कार्यवाही करण्यात आली. नव्यने वपुर्नजिवित करण्यात आलेल्या सायबर क्राइम सेल च्या माध्यमातुन गोपनीय माहिती मिळविली तसेच सी.डी.आर अनालिसिस च्या माध्यमातुन बिबट कातडी तस्करी प्रकरण तसेच मांडुळ तस्करी प्रकरणातील आरोपीस अटक करण्यात मदत झाली.

**पुर्नवसन –** चुर्णी येथे गावाचे पुर्नवसन झाल्यानंतर सुध्दा अवैधारित्या श्री रतन येवले यांचे कुटूंब त्याचे एकुण ४० म्हशींसह राहत होत. त्यांचे विस्थापन यशस्वी रित्या करण्यात आले.

### ग्रामपरिस्थितीलीय विकास समितींची स्थापना व लाइव्हलीह्ड इम्प्रुव्हमेंट प्रकल्प :–

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील विविध गावांमध्ये ग्रामपरिस्थितील विकास समित्यांची स्थापना करण्यात आली.त्यापैकी एकुण गुगामल वन्यजीव विभागातील ९, सिपना वन्यजीव विभागातील ९ आणि, अकोट वन्यजीव विभागातील १५ असे एकुण ४७ गावांमध्ये डॉ. श्यामाप्रसाद मुखार्जी जन–वन विकास योजनेमधये समाविष्ट करुन त्यांचे मार्फत्त विविध कामे करणयात आली. या मध्ये विशेषता एल पी जी वाटप करणे, भाकड जनावरे कमी करुन दुधाळ जनावरांचे वाटप करणो, शेतकऱ्यांना शोतीला सौर उर्जा संचलित कुंपन पुरवठा, वनतलाव बनविणो, गावाचे पिण्याची सोय करणो इ करण्यात आले. त्याचबरोबर गावातील महिलांना लाखेपासुन बांगड्या बनविण्याचे प्रशिक्षणा देण्यात आले. ग्रामस्थाना कुकुटपालन युनीट दिने. इ काम करण्यात आली. मे.व्या.प्र प्रतिष्ठानच्या वतीन लाइव्हलीवुड प्रकल्पाअंतर्गत युवकांना आदरतिथ प्रशिक्षणाकरीता पेंच व्याघ्र प्रकङ्पातील सिल्लारी येथे पाठविणयात आले आजपर्यंत मे.व्याघ्र तुन युवकांना मे.व्या.प्र प्रतिष्ठाण अंतर्गत आदरतिथ प्रशिक्षण इऩ्स्टीस्ट्युट सिल्लारी येथे तसेच मैटप्फोर्ट इऩ्स्टीस्ट्युट पाटणसावंगी नागपुर, ठिकाणी डिझेल व मॅकेनिकल, फ्रिज ॲन्ड युअर कंडीशनर दुरुस्ती इलेक्टेशान आणिा ब्युटीशीयन या टुडे च्या प्रशिक्षणासाठी पाठविणयात आले. त्यापैकी युवकांना या माध्यमातुन रोजगार प्राप्त करुन देण्यात आला.

**वनपर्यटन चालना:–** स्थानीक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हावी या कारणाने वनपर्यटनास चालना देण्यात आली. सन २०१६–१७ पासुन चिखालदरा वैराट सफारी नव्याने सुरु करणयात आली. त्यामुळे चिखलदरा येथे पर्यटना करिता येणाऱ्या पर्यटकांकरिता नविन सफारी क्षेत्र उपलब्ध करुन देण्यात आले. त्यामुळे चिखालदरा लगतच्या क्षेत्रामधील युवकांना मार्गदर्शक, जिप्सी चालक, तसेच जिप्सी मालक यांना याचा लाभ घेता आला. पर्यटन क्षेत्रामध्ये वन्यप्राण्यांसाठी कुरणा निर्माणा करणो तसेच त्यांसाठी कृतीम पागळे तयार करणयात आले.वैराट बरोबर , सेमाडोह, हरिसाल व शहानुर येथील सफारी पर्यटकांसाठी उपलब्ध करुन देण्यात आली. सेमाडोह येथे झिप लाईन, क्लाईबींग वॉल, रोप वे इ.च्या माध्यमातुन ॲडव्हेंनचे ॲक्टीविटी तयार करण्यात आल्या, हरिसाल या ठिकाणी कायकिंग सारखी ॲक्टीविटी सुरु करण्यात आली. तसेच शहानुर या ठिकाणी नॅचर टेफ्रींग व रोलींग बॉल यासारखया विविधा ॲक्टीविटी सुरु करण्यात आले. विविधा पर्यटकांनी मेऴघाट पर्यटनाचा लाभा घेणे करिता मॅजीकल मेळघाट ही बेबसाईट सुरु करण्यात आली. जंगल सफारी बरोबरच, हरिसाल, शहानुर, चिखलदरा या ठिकाणाी नाईट सफॅारी सुरु करण्यात आली, प्रत्येक पोर्णीमेचे

दोनदिवस अगोदर वदोन दिवस नंतर तसेच पौर्णिमेचे दिवसी मचान पर्यटकांसाठी उपलब्ध झाले. पर्यटकांना राहण्यासाठी सेमाडोह संकुल, कोलकास शहानुर या ठिकाणी इ काझी हट स तसेच विश्रामगृह तयार करण्यात आले, याशिवाय हरिसाल या ठिकाणी टेंटसची सुविधा करणयात आली.

वनपर्यटनाच्या माध्यमांतुन स्थानिकांना रोजगार प्राप्तीचे ध्येय साधण्यात आले. मेळघाट चे इतिहासामध्ये आतापर्यंत गेल्या ३० वर्षामध्ये या प्रकारची प्रथमच करण्यात येत आहे.

**वनकर्मचारी यांचे कल्याणाकारी योजना :–**

मेळघाट मध्ये वर्षात वर्षे काम करणारे कर्मचारी यांचेकरिता सर्वप्रक्षाम वनकर्मचारी यांचे निवासस्थान दुरुस्ती करुन ते राहणे योग्य करण्यात आली. त्याचबरोबर जे कर्मचारी वर्षानुवर्ष दुर्गम भागात राहतात त्यांचे आणि त्यांचे कुटूंबाचे कल्याणकरिता त्यांचा आरोग्य विमा ळषषरें ज़्झे या संस्थेमार्फत्त काढणयात आला.

वरील सर्व बाबी पाहता, निश्चितच असे वाटते की मेळघाट बदलतोय *I yes melghat is transforming....*

**लक्ष्मण अरूण आवारे**
वनपरिक्षेत्र अधिकारी
चिखलदरा

मी डिसेंबर च्या थंडी मध्ये घरी यायचो, तेव्हा नेहमी मेळघाट खुणावत असे. ते सातपुडा पर्वत तो पंचबोल पॉइंट, तो धराखोरा धबधबा असे अनेक नयनरम्य निसर्गाचे रुप बघण्यासाठी मी आवर्जुन जात असतो.

मेळघाट मध्ये माझ्या आवडीचा ठिकाणी म्हणाजे गाविलगड किल्ला. या किल्ला वर गवळी राजाच राज्य होत, त्यावरुन त्याला गाविलगड किल्ला असेनसव देण्यात आले. सातपुडा पर्वत रांगेत वसलेला हा किल्लाच सौंदर्य टिकाव यासाठी प्रयत्न करत आहे.

गाविलगड किल्ला ची खासियत ही की हा किल्ला शत्रुला जिंकणा अवघड होते. कारण की किल्ला शत्रु ला जिंकण अवघड होते. कारण की किल्याला असलेले उंच उंच असलेले परकोटा आणि विशेषा म्हणाजे या किल्यावर असलेले एतीहासीक तोफ . या तोफ त्याकाळातील किल्याची व शुरविरांच्या साक्षिदार आहेत.

मी प्रतीक संजय गावंडे परतवाडा मला आलेल्या मेळघाट बद्दल आलेला अनुभव सांगतो. ते २०१७ चे शेवटचे दिवस होते मि आणि माझ्या मित्रांनी मेळघाट जायचा बेत आखला आमच्या परतवाडा पासुन २० कि.मी. च्या अंतरावर चिखलदरा आहे. त्या नागमोडी वळणाचा आनंद घोत आम्ही चिखालदरा ला पोहचलो.


ते तेथे दगडामधे असलेले देवीचे मंदीर आणि त्यातुन झीरपनारे नाणाी ते सगळ्यांना अचंबित करायचे. देविपॉईंट पासुन थोड समोर गेल्यावर येतो. गावीलगड किल्ला किल्याचे असलेले भलेमोठे व्दार आणि त्या समोर असलेला तलाव निसर्गप्रमीना त्याकडे खेचुन आणतो.किल्याच्या शेवटच्या टोका पर्यत पोहचायला एक ते दीड तास लागतो.किल्ह्या मध्ये असलेले तलाव ,दगडाचे बांधकाम हे त्या काळातील जिवनशैलीचे उत्तम नमने आहेत.

निसर्गाचा आणखी एक उदाहरण म्हणजे पंचबोल पॉईंट मेळघाटच्या सौंदर्यात आणाखी भर घालतो.

मी काही वर्ष मेळघाटात रहालो असल्याने मला त्या बद्दल खुप प्रेम आहे. अशा अनेक निसर्ग वरदान असलेला हा माझा मेळघाट आहे. धन्यवाद

आपला प्रिय
**प्रतिक गावंडे**

## गाविलगड



## अब बात निकली है तो..
# दुरतलक जाने दो

मध्यंतरी फेसबुक वर मेळघाटामधिल हरणाांचे एक छायाचित्र नजरेस आले होते. जंगलात फेकलेले डायपर हरिणााने खाातांना पाहून काहूर माजल डोक्यात पण शांत केल स्वत ला वाटल हतबल होण्यापेक्षा जंगल आणि त्यात आपल फिरणं याविषयी जागती करायला हवी. मुळातच वन्यजीवांना व त्यांच्या विविध जातींना वाचवंण ही आताची आपली मुलभूत गरज आहे. वन आणि वन्यप्राणी सुरक्षित, स्वच्छ तर आपण ही सुरक्षित, स्वच्छ हे आपण समजून घ्यायला हवं.

फूडचेन हा विषय आपण लहानपणी शाळेत शिकलो आहोत. फूडचेन च्या उच्चस्तरातील प्राणी (म्हणजे वाघ,सिंह,बिबट हे मांजरीच्या कुळातील प्राणी) सुरक्षित तर त्याखालील स्तरही सुरक्षित व संतुलित राहतो. समजा शिकारी किंवा अन्य कुठल्याही कारणाने हे फुडचेनच्या उच्च स्तरातील प्राणाी नष्ट झाले तर गवत,झाडपाला यावर जगणारे म्हणजेच तृणभाक्षी प्राणी यांची संख्या इतकी आहे कि हे काही काळातच संपूर्ण जंगल खाउन ओसाड करु शकतात. झाडे नाही तर पाणी आणि पाउस नाही तर तुम्ही आम्ही नाही.

थोडक्यात “Save Tiger-Save Earth..., Save Life” हे वाक्य आपण ठिकठिकाणी वाचतो, ऐकतो त्याचा अर्थ हा असतो, वाघ नाही तर आपण नाही. याच वाघाला पाहण्यासाठी जेव्हा आपण मोठ्या हौशीने जंगलात जातो. तेव्हा नेमक थ्रील अर्वीशर्पीीश एक्साइटमेंट मध्ये जंगलात वागण्याची शिस्त विसरतो.अगदी प्रायमरी लेवलवर आपण आपली मर्यादा व शिस्त पाळू शकतो.

१. जंगलाच्या सीमारेषा शिरतांना सर्वप्रथम आपले गाडीत मोठ्याने वाजणारी गाणी बंद करा. वन्यप्राण्यांना या आवाजाची सवय नसते.

२. मोठ्याने हॉर्न वाजवणे पूर्णपणे बंद करा. या आवाजाने वन्यजीव डिस्टर्ब होतात. बिथरता,घाबरतात,सैरभैर होतात.

३. आपल्यासोबत नेलेले चिप्स,बिस्किटांचे रॅपर्स, प्लास्टिकच्या पिशव्या, पाण्याच्या व इतर बाटल्या, लहान मुलांचे वापरलेले कागद बाहेर प फेकता गाडीतच . वेगळी कचरा पिशवी करुन त्यात जमा करावा. आपण शाहरी क्षेत्रात आल्यावर कचरा पेटीत टाकावा. जंगलात हा कचरा टाकल्यास वन्यप्राणी तो खाउन न पचल्याने मृत्यूमुखी पडतात.

४. जंगलात विडी, सिगरेट, पीणे,शेकोटीसाठी वा चुलीसाठीआग लावणे, कल्पने पलिकडे घातक ठरु शकते. एक चिंगारी संपूर्ण जंगल काही वेळात भास्मसात करु शकते.वन्यजीवांना वाट न मिळाल्याने ते आगीत जिवंत भाजले जाउन मारु शकतात. विडी, सिगरेट चा धुर, वास प्राण्यांना जळणाचा वास, वाटून ते तुम्ही असलेल्या जागेपासून शाक्य तितक्या दूर जातात.

५. सफारीदरम्यान प्राणी दिसल्यास आरडाओरडा, गोंधळ न करता शांतपणे व्हावेत, त्यांच्या पुढे जाण्याचे आगाउ धाडस करु नाये आत्मरक्षणासाठी प्राणी आकृमक पावित्रा घेवु शकतात.

६. चालतांना नसरडया पायवाटा , शेवाळी दगधउ, खडक पाहुन सांभाळुन चालावे. जंगलात समुह सोडुन एकटे फिरू नये.

७. पानांच्या खाली. दगडांखाली. पाणथळ–ओलसर जागी, विंचु विषारी किटक असतात त्यामुळे जंलात पायी फिरण्यासाठी चांगली पकड असणाारे आणिा फिटिंगचे बुट घालावे.

८. जंगलात फिरतांना कानात हेडफरेन, गॉगल्स, हिल्स, साध्या चपला घालु नये. सेल्फिखचा मोह आवरावा.

९. फिरता फिरता झाडे पाने फुले ओरबाडणे धिंगाणा, मोठ्याने बोलणे. खिदळणो, मस्तीत राहणे हे टाळावे.

१०. आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे जंगल फिरण्यासाठी सोबतीला जंगलाची माहिती असणारे गाईड, वनअधिकारी, जंगलात फिरण्याचा भरपुर अनुभव असणारी व्यक्ती सोबत असणे आवश्यक आहे. जंगलात अधिकच धाडस जिवावर बेतु शकत हे लक्षत घ्यावे.

इतक्या साध्या गोष्टी लक्षात घेतल्यास संभाव्य धोके आणि पर्यावरण, जंगल यांची काळजी आपण घेऊ शकतो. सोशल नेटवर्कींग साइट्स व माहिती देतांना एखादा प्राणी खासकरून कॅट फॅमीलीतील प्राणी असल्यास त्या प्राण्याच्या एरियाची माहिती देऊ नये. कारण जसे हौशी वाचक आपली पोष्ट वाचून माहिती मिळवतात तसेच पोचर्स म्हणजे शिकारी तस्कर ही माहिती गोळा करत असतात. तेव्हा ही माहिती गुप्त ठेवणे प्राण्यांसाठी हितकारक आहे. वनसंपत्ती हा आपला खजिना आहे, त्याच संरक्षण आपल जबाबदारी आणि गरज आहे.

- वर्षा चौधरी (मुंदे)
मेळघाट प्रेमी, वन्यजीव अभ्यासक
संपर्क – ७३८७१९२६८३

# Eco- Tourism Initiatives in Melghat Tiger Reserve



# Harisal Mein Pani Pani...











*Accommodation Facility*

# Kolkas...

Hathi mere Sathi



## Come to Kolkas - Melghat







\# *Safari on Elephant @ 9 am to 12 noon* }
*@ 4 pm to 6 pm* } *Rs. 800/- for 4 pax.*

\# *Bathing Elephants @ 1 pm to 2 pm - Rs. 25/- for adults & Rs. 10/- for children under 12.*

\# *Feeding Elephants @ 6 pm to 7 pm - Rs. 25/- for adults & Rs. 10/- for children under 12.*

**Do you want to adopt one of our Elephants?**

You can!!! for just Rs. 65,000/- for three months!!!

Contact us on - **magicalmelghat@gmail.com**

# Magical Semadoh...

## Newly Improved Accommodation Facilities





## Test your skills @ Semadoh










# Jai Narnala... Shahanoor

## Night Safari & Machan Stay, Great Adventure










# कुला - किशोर व्हॉलीबॉल स्पर्धा

(फक्त मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील गावांकरीता)

मित्रांनो कुलामामा म्हणजेच आपल्या वाघाच्या प्रेमासाठी व स्व. किशोर कासदेकर यांचे स्मृतीप्रित्यर्थ व्हॉलीबॉल खेळांचे आयोजन सेमाडोह येथे करण्यात आले.

**प्रथम बक्षीस** – रू. २१,०००/- व स्मृतीचिन्ह

**द्वितीय बक्षीस** – रू. ११,०००/- व स्मृतीचिन्ह

**तृतीय बक्षीस** – रू. ७,०००/- व स्मृतीचिन्ह

**सर्वोत्कृष्ट खेळाडू** - रू. १,१००/- व स्मृतीचिन्ह

**सर्वोत्कृष्ट सर्व्हर** - रू. १,१००/- व स्मृतीचिन्ह

**सर्वोत्कृष्ट स्मॅशर** - रू. १,१००/- व स्मृतीचिन्ह

**सर्वोत्कृष्ट डिफेंस** - रू. १,१००/-व स्मृतीचिन्ह







# BOOKING TARIFF & DETAILS

## For Safari

| सफारी प्रवेश शुल्क SAFARI FEES DETAILS | भारतीय पर्यटक (Indian Tourist) | विदेशी पर्यटक (Foreign Tourist) |
|---|---|---|
| १. प्रौढ (Adult) | - Rs.30/- | - Rs. 60/- |
| २. मुले (Children) | - Rs.15/- | - Rs. 30/- |
| ३. हलके वाहन (Light Vehicle) | - Rs.100/- | - Rs. 100/- |
| ४. जड वाहन (Heavy Vehicle) | - Rs.50/- | - Rs. 150/- |
| ५. मार्गदर्शक (Guide) | - Rs. 300/- | - Rs. 300/- |

| Sr. No. | Gate Name | Vehicles Allowed /day Morn. | Vehicles Allowed /day Eve. |
|---|---|---|---|
| 1. | Chikhaldara / Vairat | 20 | 20 |
| 2. | Semadoh | 20 | 20 |
| 3. | Harisal | 20 | 20 |
| 4. | Shahanur / Narnala | 08 | 08 |
| 5. | Dhargadh | 22 | 21 |
| 6. | Ambabarwa /Wasali | 22 | 21 |
| 7. | Wan / Zari | 22 | 21 |

### Timings

| Safari | Morning | Afternoon |
|---|---|---|
| Entry Timings | 6:00 am to 8:00 am | 3:00 pm to 5:00 pm |
| Exit Timings | By 10:30 am | By 6:30 pm |

Timings will change depending on season

## For Accommodation

| Name of the Stay | No. of suites | No. of beds/ suite | Room tariff | Extra persons permitted | Per person charge |
|---|---|---|---|---|---|
| **Location: Semadoh*** | | | | | |
| Semadoh A type | 04 | 02 | 2,000.00 | 2 | 350.00 |
| Semadoh Circular | 06 | 02 | 1,500.00 | – | |
| Kokila Dormitory | 02 | 16 beds. per bed | 350.00 | – | |
| Mayur Dormitory | 02 | 16 beds. per bed | 350.00 | – | |
| **: Room/ Dorm includes complimentary fixed menu breakfast, adventure park , wi-fi, elephant bath & feed.* | | | | | |
| **Location: Kolkas**** | | | | | |
| Kolkas Upper VIP | 02 | 02 | 1,500.00 | 1 | 350.00 |
| Kolkas Lower Cottages | 07 | 02 | 700.00 | – | |
| Dormitory | 02 | 14 beds. per bed | 350.00 | | |
| ***: Room rate includes complimentary fixed menu breakfast, wi-fi, elephant bath & feed.* | | | | | |
| **Location: Harisal***** | | | | | |
| Cottages | 04 | 02 | 1,500.00 | – | |
| ****: Room rate includes complimentary fixed menu breakfast, kayaking for 1/2 hour, wi-fi, elephant bath & feed.* | | | | | |
| **Location:Shahanur****** | | | | | |
| Cottages | 02 | 02 | 1,200.00 | – | |
| Eco huts | 07 | 02 | 1,200.00 | – | |
| Eco Tents | 06 | 02 | 1,200.00 | – | |
| Dormitory | 02 | 14 beds. per bed | 300.00 | – | |
| *****: Room/ Dormitory rate includes complimentary adventure, wi-fi.* | | | | | |
| **Location:Katepurna** | | | | | |
| Delux huts | 01 | 02 | 1,000.00 | 1 | 200.00 |
| Eco huts | 02 | 02 | 500.00 | – | |
| **Forest Rest Houses** | **(will be starting soon)** | | | | |
| Location: **Dhakna** | 02 | 02 | 5,000.00 | – | |
| Location: **Chaurakund** | 02 | 02 | 5,000.00 | – | |
| Location: **Rangubeli** | 02 | 02 | 5,000.00 | – | |
| Location: **Tarubanda** | 02 | 02 | 5,000.00 | – | |

**Elephant Activities - At Kolkas**

Elephant Safari — Rs. 800 per safari for maximum of 4 pax for half an hour. Timing : 9.00 am to 12.00 noon & 4.00 pm to 6.00 pm

Elephant bathing : Ticket : Rs. 25/- per person 1.00 pm to 2.00 pm

Elephant feeding : Ticket : Rs. 25/- per person 6.00 pm to 7.00 pm

**Adventure activities - At Semadoh** **Combo rate Rs. 200 /- p.p.**

Adventure Park : @ per person Rs. 100/- for 7 activities

Zipline : @ per person per ride Rs. 150/-.

**Kayaking - At Harisal -** @ per person Rs. 100/- for 1/2 hour

**Bookings for activities: on the spot.**

**For online bookings visit website : www.magicalmelghat.com**

Heavenly

# Harisal

## Night Safari & Water Adventure

# Harisal mein Pani Pani...











## Harisal Exploration - by the day and also by the night!

The meandering Sipna reaches Harisal and gets transformed into a nice waterbody - by the side of the forest campus. You can sit under the huge Ficus, Arjuna and Jamun trees to enjoy the solitude. Or simply drop in at the nice restaurant in the tourism campus, for a taste of the local flavours.

Incidentally you also have a choice of stays - A nice forest camp site or a homely Homestay! The homestays give you an opportunity to learn from the lives of the local communities.


## Kayaking on the Sipna River

One of the most peaceful activities - set in an idylic location is Kayaking on the Sipna River at Harisal. You can race with your friends on a second kayak - or just laze out on a slow moving kayak - watching birds overhead or even a monitor lizard out basking on a tree bark.

Also we suggest you explore the simple yet cosy homestays in the Harisal village to understand how local communities have evolved as a Digital Village. You can also walk with a local to his agricultural field and understand the cropping patterns and challanges that he has to face. Will be a worthwhile experience.




UPA-60W
12 V DC



To, ______________________________

______________________________

______________________________

______________________________

**Office of Chief Conservator of Forests & Field Director**
**Melghat Tiger Reserve @ Amravati.**

**Melghat Tiger**
Conservation Foundation

You are invited to explore the all new accommodation and restaurants at Semadoh, Narnala , Harisal and Kolkas. My team will ensure you will have a great time.

**Website: - www.magicalmelghat.com**

**Please feel free to coordinate with Mr. Swapnil, E-mail :** magicalmelghat@gmail.com **or call him on +91- 8956563016. He will help you plan your programme.**

मेळव्याघ्र मध्ये प्रसिद्ध झालेले लिखाण लेखकांची वैयक्तीक विचारधारणा आहे.

मेळघाट व्याघ संवर्धन प्रतिष्ठानास प्राप्त होणाऱ्या देणग्या, आयकर अधिनियमाच्या कलम ८० जी अंतर्गत ५०% आयकर सवलतीस पात्र आहे. निसर्ग संवर्धनाला मदत करा आणि आयकरात मदत करा व आयकरात सूट मिटवा. प्रतिष्ठानचे बँक खाते मेळघाट व्याघ्र प्रकल्प प्रतिष्ठान या नावे ॲक्सीस बँक, लि. अमरावती (महा.) च्या शाखेत आहे. खाते क्र. ९१५०१०००२५७४२३१, IFS Code : - UTIBOOO265